# चैतन्य लहरी

अंक क्र. ११, १२

नोव्हेंबर-डिसेंबर २००१



सहजयोग्यांनी अबोधिततेचा सदैव आदर व सन्मान केला पाहिजे,
अबोधितता बळकट करण्यातच तुमच्या जन्माचे सार्थक आहे.

गणेश पुजा, कबेला, २२ सप्टेंबर २००१







# अनुक्रमणिका

परित्राणाय साधूनाम् ....विनाशाय च दुष्कृताम... ४

गणेश पूजा - कबेला,२२ सप्टेंबर २००१ ... ५

श्रीमाताजींनी दिवाळी निमित्त सहजयोग्यांना लिहिलेले एक दुर्मिळ पत्र ... ९

संत कबीर:दोहे ... १०

नवरात्री पूजा -ग्रीस : २१ आक्टोबर,२००१ ... ११

पूर्व विभाग सहजयोग सेमिनार २००१ ... १५

अमृत वाणी ... १७

दहा गुरुंची अवतरणे - लाआ त्से ... १८

श्रीमाताजींना मिळालेले मान सन्मान व किताब ... १९

दिवाळी पूजा आक्टोबर १९८९ मॉंटेकाटीनी ... २०

सहजसमाचार ... २२

सर्व सहजयोगी बंधु व भगिनींना नववर्षाच्या शुभेच्छा.

आपणा सर्वांना नविन वर्ष सुख समृध्दीचे व आनंदाचे जावो.

# ....परित्राणाय साधूनाम् विनाशाय च दुष्कृताम्.......

नवीन सहस्त्रकाची पहाट उजाडता-उजाडतांच समस्त मानवजातीला कालिमा फासणाऱ्या भयानक घटना नुकत्याच घडल्या. मानवजातीचाच पण अमानवी, क्रूर व सैतानी प्रवृत्तीच्या लोकांनी घडवून आणलेल्या या उद्रेकाचे हादरे जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोचले. त्यांचे परीणाम सामान्य, निष्पाप लोकांवर झाले आहेतच; पण त्यांचा अनिष्ट प्रभाव राजकीय, प्रशासनिक, अर्थिक, व्यावसायिक व दैनंदिन क्षेत्रांतही पडल्यामुळे समस्त मानवजीवनच ढवळून गेले आहे. आपणच उन्नतीमार्गे निर्माण केलेल्या मानवाची ही दुर्गति पाहून त्या परमेश्वरालाही हळहळ वाटली असेल. प. पू. श्रीमाताजींनी या काळाला 'घोर कलियुग,' असे संबोधिले आहे आणि या काळांतील 'कली' चा महिमा, त्यांच्याच शब्दांत कसा सांगितला आहे याबद्दल वारंवार उल्लेख केला आहे. श्रीमाताजींनी १९७० साली सुरु केलला सहजयोग ही ते शब्द साकार करणारीच घटना आहे. माणूस पशुयोनीतूनच क्रमाक्रमाने उन्नतीच्या मार्गावर प्रगत होत-होत उच्च मानव स्थितीला आला. मानव जन्माचे हे महत्व व महात्म्य लक्षांत न घेतल्यामुळे अहंकार बळावत जाऊन माणसामधील सुप्त पशुवृत्ति डोके वर काढू लागतात व त्यावर नियंत्रण ठेवण्याची सूज्ञता गमावल्यावर त्यांचा अतिरेक होऊन माणसावर सैतानी प्रवृत्ति प्रभाव पाडतात. म्हणुनच भौतिक प्रगति व वैचारिक अधोगति हा विरोधाभास मानवी जीवनांत आजकाल अधिकाधिक दिसून येत आहे. वर उल्लेख केलेल्या घटना या सर्वांचा एक परिपाक आहे.

माणसामधे आंतरिक परिवर्तन झाल्याशिवाय ही परिस्थिति सुधारणार नाही व सहजयोग हाच त्यावर एकमेव उपाय आहे, हाच संदेश श्रीमाताजी आजपर्यंत देत आहेत. हा संदेश जगभर पसरवण्याचे आपणा सर्व सहजयोग्यांचे एकमेव कर्तव्य आहे; कारण आपण त्यांच्या या प्रचंड कार्याचे एक उपकरण आहोत. अलिकडच्या प्रवचनांत, दहशतवादाने ग्रासलेल्या परिस्थितीत, सहजयोग्यांनी कसे वागायचे याबद्दल प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे त्यांनी खूप कांही सांगितले आहे. सहजयोगाने आपल्याला काय दिले याचे नीट भान ठेवणे, सतत आत्मपरीक्षण करुन आपल्यामधील प्रकाश अधिक तेजस्वी बनविणे, तोच प्रकाश जास्तित जास्त लोकांना पोचविण्याचा ध्यास घेणे व त्याच बरोबर स्वतःची गहनता वाढविणे, प्रेम व करुणा हाच जीवनाचा पाया बनविने याबद्दल श्रीमाताजी आवर्जून वारंवार सांगत आहेत. आपल्याकडे पाहूनच दुसरे लोक सहजयोग स्वीकारणार आहेत हेच त्यांच्या उपदेशाचे सार आहे.

सहजयोगी 'संत' असतात असे श्रीमाताजी सांगतात. आपणा सर्व सहजयोग्यांना श्रीमाताजींचे आशीर्वाद व संरक्षण सदैव, सदासर्वकाळ आहेच. या पदवीसाठी आपण जितके लायक बनू तितक्या प्रमाणांत समाजामधें सत्प्रवृत्ती वाढीस लागतील व जगामधील दुष्ट, सैतानी प्रवृत्तीचे निर्दालन होईल. 'परित्राणाय साधूनाम विनाशाय च दुष्कृताम' हे महान अवतारकार्यच आहे व त्यामधे सर्वांयांने सहभागी होणे हाच आपला धर्म आहे.



# गणेश पुजा

प.पू.श्रीमाताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश)
कबेला, २२ सप्टेंबर २००१

**अबोधितता बळकट करण्यात सहज-जीवनाचे सार्थक आहे आणि तिची शक्ति प्रकट झाली पाहिजे. सतत प्रेम व करुणा बाळगल्यावर ही अबोधितता तेजस्वी बनते. तीच तुमचा सांभाळ व संकट निरसन करते.**

आज आपण श्री गणेशांची पूजा करण्यासाठी एकत्र जमलो आहोत. श्री गणेश अबोधिततेचे अधिपति आहेत, त्यांची अबोधितता सागरासारखी आहे. अगदी लहान मुलाचे रुप असलेले श्रीगणेश समस्त जगाबरोबर युध्द करण्याइतके बलशाही आहेत. कुठल्याही विरोधी शक्तीला ते नेस्तानाबूत करु शकतात. यातून त्यांची अबोधितताच व्यक्त होते.

काही मुले अगदी उंच मजल्यावरुन पडल्यावरही सुरक्षित राहिल्याची उदाहरणे तुम्हाला माहित आहेतच; त्यांना हे संरक्षण त्यांच्यामधील अबोधिततेमधूनच मिळते. या अबोधिततेमधे जगातील सर्व शहाणपणा व समजुतदारपणा सामावलेला आहे. जगात कुठेही अबोधिततेवर हल्ला झाला तर ती न समजणारे किंवा न जाणणारे सर्व लोक त्याचा प्रतिकार करण्यासाठी पुढे येतात आणि अशा विरोधी शक्तीला तोंड देतात. तुम्ही हे पण पाहिले असेल की एखाद्या मुलाला कुणी त्रास देत असला तर आजूबाजूचे सर्वजण, मग ते वेगवेगळ्या जाती-धर्मांचे असले तरी, त्याला वाचविण्याचा प्रयत्न करण्यास तत्परतेने सावरतात. हे कशाचे लक्षण आहे व ती स्फुर्ती कुठुन मिळते हे लक्षात घ्या.

आजकाल या अबोधिततेवरच सगळीकडे हल्ला होत आहे. ही आपल्यासाठी लाजिरवाणीची गोष्ट आहे. बाकी इतर कसलेही प्रकार खपवून घेतले जातात, पण सामान्य, निष्पाप व ज्यांचे कुणाशीही वैर नाही अशा साध्यासुध्या लोकांवर जेव्हां प्राणघातक हल्ले होतात तेव्हां प्रत्येकजण जरी प्रत्यक्षांत त्याचा प्रतिकार करु शकला नाही तरी कुणीही ते सहन करु शकत नाहीत व कुणालाही असले प्रकार आवडत नाहीत. त्याच्या मागे हेच कारण असते की, आपल्यामध्ये मुलांबद्दल कमालीचे प्रेम व सहानभूति असते. आतां लहान मुलांवरही अत्याचार केल्याचे किंवा सर्वसामान्यांनाही त्रास देण्याचे प्रकार घडतातच पण कुणालाही ते योग्य आहेत असे वाटत नाही. म्हणून अशा त्रासदायक व्यक्तिंना त्यांचे परीणाम भोगावे लागणारच.

अबोधिततेच्या विरोधात प्रतिक्रियात्मक कृत्ये माणसे का करत असतात याचा विचार झाला पाहिजे. उदा.एखाद्या लढाईत भाग घेणाऱ्या सैनिकांजवळ सहानुभूति नसते; किंवा असे म्हटले जाते की, त्या लोकांची कुवतच तेवढी आहे; किंवा फसवेगिरी करण्यात पटाईत असणाऱ्यांना दुसऱ्याना कसे चकवले यातच मोठेपणा वाटतो. अशी फसवगिरी स्वत:वरही उलटते ही गोष्ट ते लोक विसरतात. अशा अनेक कारणांमुळे लोकांचा अबोधिततेवरचा विश्वास डळमळतो. पण अबोधितता नेहमीच विश्वासार्ह असते, तीच सदैव आपल्या उपयोगी पडते कारण तिच्यामध्ये महान शक्ति असते.

कांही लोक आपल्या अबोधिततेचा आदर बाळगत नाहीत; त्यांना वाटते की अबोधित माणुस दुबळा होतो. त्यांना अबोधिततेच्या शक्तीची,ती कसे व काय कार्य करते याची कल्पना नसते. सगळीकडे तिचे कार्य चालत असते पण सामान्य माणसांना त्याची जाणीव नसते. अबोधितता जोपासणे हा फार उच्च दर्जाचा गुण आहे.कारण ती सर्व कांही समजुतदारपणे व सुंदरपणे घडवुन आणते.

आता मानवी इतिहासामध्ये व्यक्तीच्या निर्वाणानंतर पुष्कळ काळ पुढेही त्या व्यक्तीची

जीवनमूल्यें व आदर्श लोकांच्या स्मरणात रहातात; त्यांचे जीवन, चारित्र्य, सद्गुण, कार्याची महानता इ.गोष्टी त्यांच्या पश्चातही आठवल्या जातात. त्यांना आयुष्यांत बराच त्रास भोगावा लागला असला किंवा त्यांना ठार मारण्यात आले असले तरीही त्यांचा मोठेपणाच स्मरणात रहातो, याला कारण त्यांची अबोधितता आणि त्यामुळेच असे लोक कायम प्रकाशांत येतात. पण अशा लोकांचे जीवन पाहिले तर ते नेहमी साधे, सरळ व सहज असते.

जगात अनेक राष्ट्रांचा अस्त होईल पण अबोधितता कधीच नष्ट करता येणार नाही. हे पक्के लक्षात ठेवा तुमचा स्वत:वर पूर्ण विश्वास हवा आणि तुमचा खरा 'स्व' म्हणजेच अबोधितता. तुम्हाला कदाचित वाटेल की, अबोधित माणसांना नेहमीच फसविले जाते पण अबोधितता चिरंतन असल्यामुळे तिला कुणीच फसवू शकणार नाही. पैशाच्या किंवा तसल्या इतर गोष्टींच्या बाबतीत जशी फसवणूक होते तसे तुमच्या अबोधिततेबाबत कधी होणार नाही. म्हणूनच आपल्यामधील अबोधितता जाणीवपूर्वक सांभाळली व पूर्णपणे बाणवली की तुम्ही यशस्वी होणारच.

मी वर म्हटल्याप्रमाणे अबोधितता कुणीच नष्ट करु शकत नाही. काहीवेळा त्याच्यावर दुर्विचार, दुष्कृत्ये इ. चा पडदा जरुर येऊ शकतो पण अशा प्रवृत्ति दूर झाल्या की ढग वाहून गेल्यावर आभाळ जसे स्वच्छ दिसते तशी ती चमकू लागते आणि तुम्हाला मिळवण्यासारखे जगात काहीच उरत नाही. ख्रिस्ताचेच उदाहरण घ्या; त्यांचा खूप अपमान झाला व हालहाल करुन सुळावर चढवले गेले पण ज्या लोकांनी हे सर्व केले त्यांचे नावही घेतले जात नाही, वा त्यांच्याबद्दल कुणाला माहिती नाही. पण ख्रिस्त मात्र अजरामर झाले आणि जगभरात त्यांचेच नाव आदराने घेतले जाते. पण आता वेळ अशी आली आहे की, जो कोणी अबोधिततेचा आदर राखणार नाही तो उघडकीस येईल आणि त्याचा नाश होईल याची खात्री बाळगा.

मी याआधी अनेक वेळा सांगितले आहे की, सहजयोग्यांनी मुलांवर कधीही ओरडू नये किंवा त्यांना शिक्षा करु नये. मुख्य गोष्ट म्हणजे लहान मुलांबरोबरचे आपले व्यवहार व वागणे प्रेम बाळगुनच झाले पाहिजेल. मग ते मूल परक्याचे, दुसऱ्या देशातील वा कुटुंबातील असेल किंवा ते अकारण तुमच्याजवळ आकृष्ट होत असेल तर ती त्याच्या मधील, तसेच तुमच्यामधील अबोधितताच व्यक्त होत असते व तीच सांभाळ करीत असते व संरक्षण पुरवते. कांही लोक लहान मुलांचा बळी द्यायला तयार असतात ही फार आश्चर्यकारक गोष्ट आहे; त्याचा अर्थ अबोधिततेवर आघात करणे हाच आहे.मुलांना कधीही छळू नये; त्यांच्या जवळ स्वत:चे रक्षण करण्याची सुप्त क्षमता असली तरी लहान मुलांवर कसलेही अत्याचार करणे ही फार अशुभ, निर्दयपणाची व गलिच्छ प्रवृत्ति आहे.

तुम्हाला मुलांवर प्रेम करता येत नसेल तर तुम्हाला कशावरही प्रेम करता येणार नाही. मुले न आवडणारा माणूस मला अजूनतरी आढळला नाही. तुम्हाला फुले आवडतात याच्यामागेही फुलांमध्ये अबोधिततेची सुंदरता लपलेली असतेच; त्याचप्रमाणे निर्सगाचे आकर्षण असते कारण त्यामधील अबोधितताच. अर्थात मनुष्यप्राण्यामध्ये ती सहजयोग्यांतच व्यक्त होते.

चलाख असणे किंवा लुच्चेगिरी करणे ही फार सोपी गोष्ट आहे. पण अबोधितता राखणे यातच खरे शहाणपण आहे. आपल्यामधील अबोधितता किती सुंदर आहे हे समजून घ्या. कांहीजण असेही म्हणतील की, निरागस साध्या माणसाला कुणीही फसवतो. पण खरे तर अबोधिततेचा कुणीही गैरफायदा घऊ शकत नाही; कुणाला काही काळ तसे वाटेल, अबोधित माणसावर कधी कधी अधिकार गाजवला जाईलही पण त्याचा परिणाम होणार नाही. कारण अबोधितता एकाद्या खडकासारखी भक्कम असते. समुद्रांच्या लाटांचा खडकावर काही परिणाम होत नसतो तशी ती भक्कम असते; सूडभावनेचाही तिच्यावर परिणाम होत नाही; कारण श्रीगणेशच तिचा सदैव प्रतिपाळ करत असतात. अबोधितता कधीच नष्ट करता येत नाही; माणूस कितीही निर्दय, पापी असला तरी त्याला ते शक्य नाही. कारण परमेश्वराकडूनच ही सुप्त शक्ति मिळालेली असते.

आपणच कधी कधी या अबोधिततेचा अनादर करतो, तिच्याकडे दुर्लक्ष करतो, 'मला हे योग्य वाटत 'असे म्हणत स्वत:चे सर्मथन करत राहतो. पण त्यामुळेच ही शक्ति कमजोर होत जाते वा झाकली जाते. अबोधिततेला जेंव्हा आव्हान केले जाते, तेव्हा सहानुभुती प्रकर्षाने प्रकट होते. माणसांमध्ये श्रीगणेशांची ही शक्ति प्रस्थापित केलेली असल्यामुळेच लहान मुलांवर किंवा निष्पाप माणसांवर संकट बेतले की, लोक तत्परतेने मदतीला धावून येतात. म्हणूनच अबोधितता नाहीशी करणाऱ्या दुराचाऱ्यांच्या विरोधात समस्त जगामधील लोक पुढे येऊ शकतात, याबद्दल शंका नाही; तसे न करणारे लोक मानव नव्हेच असे म्हणावे लागेल.

माणूस कितीही मोठा असला वा कसलाही त्याग करण्यास

तयार असला तरी त्याच्या मनातील ही अबोधिततेची भावना तो विसरु शकत नाही. ही फार आश्चर्याची गोष्ट आहे. प्रेमाचा व रक्षण करण्याचा हा मोठा खजिना (सागर)सगळीकडे तयार आहे. त्यातूनच लहान मुले व निष्पाप लोकांवर आलेल्या संकटाशी सामना करण्याची शक्ति मिळत असते. मानव जातीचे हे एक सुंदर नवलच आहे.जगांत क्रूर,असुरी प्रवृत्तीची माणसे मुळीच नाहीत असे मी म्हणत नाही; पण मुलांचा किंवा निष्पाप लोकांचा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा ही जबाबदारीची जाणीव निर्माण होतच रहाणार. बऱ्याच लोकांना या अबोधिततेचे भान राखणे आवघड जाते; कारण आपण कुणी विशेष आहोत, आपल्याला सर्व माहीत आहे, सर्व समजते, आक्रमकपणा दाखवूनही काही बिघडत नाही, इ. इ. समजुती त्याच्या मनात घर करुन राहिलेल्या असतात; पण अशा माणसाची कुणी आदराने आठवण काढत नाही वा त्याच्या दुष्कृत्याचा कधीच सन्मान केला जात नाही.

**सहज-संस्कृतीमध्ये सहजयोग्यांनी आपल्यामधील अबोधिततेचा आदर करावयास शिकले पाहिजे.** सहजयोग्यांनाही कधी कधी अपमानकारक वागणूक मिळते, कधी फसगत होते, कधी कधी त्यांच्यावर अधिकार गाजविला जातो, पण तरीही अबोधितच राहिले पाहिजे. कारण त्यांना श्रीगणेशांची शक्ति मिळाली आहे. म्हणून अशा प्रसंगांत त्यांनी निराश होऊ नये किंवा दुसऱ्याच्या अबोधिततेला धक्का लाऊ नये. आपोआप सर्व काही सुरक्षित केले जाईल. अबोधिततेला आव्हान होताच जगभरातील चांगुलपणा मदतीला येतो.

आलिकडे झालेल्या युध्दामधूनही हेच लक्षात येते. सामान्य लोकांनाच, त्यांचा काही संबंध वा दोष नसतानाही, प्राणास मुकावे लागते, किंवा हालाअपेष्टा सहन कराव्या लागतात. त्या प्रसंगात त्यांना मदत करण्यासाठी सबंध जगभरातून लोक कुढल्याही राष्ट्राचे वा धर्माचे असले तरीही पुढे येतात. म्हणून आपण आपल्याच सोयीप्रमाणे व आपल्याच उद्देशासाठी कांहीही करायला तयार होतो आणि ते करताना मागचा पुढचा विचारही करीत नाही. किंवा आपल्याकडून काही चुकत तर नाही ना याचे भान ठेवत नाही. तेव्हा आपल्याला त्याचे पुढचे परिणाम लक्षात येत नाहीत. हिटलरचे उदाहरण पहा; त्याला वाटत होते की, तो असंख्य लोकांना ठार करु शकतो आणि सबंध जगाला आपल्या मुठीत ठेवु शकतो व त्यांतच त्याचा पराक्रम आहे. पण काळाच्या इतिहासात कुणीच त्याचा सन्मान केला नाही. त्याला खरेखरच जर सर्व जगावर साम्राज्य गाजवणारा महान पुरुष असे नाव कमवायचे असते तर पूर्वीच्या महान पुरुषांचे तो अनुकरण करु शकला असता. अशा महान पुरुषांची शक्ति म्हणजेच त्यांची अबोधितताच. अविधिततेची ही शक्ति कसे कार्य करते मला सांगता येणार नाही कारण ती अनेक प्रकारे कार्य करीत असते. इतिहासातील घटनांकडे तुम्ही पाहिले तर हेच दिसून येत की **साधा पण निरागस व सूज्ञ माणूसच लोकांच्या कायम स्मरणात राहतो.**

लहाणपणी शाळेत असताना लायब्ररीत महान व मोठमोठया पुरुषांची चरित्रे वाचण्याचा मला नाद होता. त्यांचे जीवन साधे असूनही त्यांचे महान कर्तुत्व पाहून मी भारावून जात असे. उदा.अब्राहम लिंकन; मला त्याचा फार अभिमान वाटतो. पण त्याच्या बायकोकडून त्याची मानहानी सतत होत असे; ती त्याला अजागळ म्हणत असे. पण त्यालासुध्दा ठार मारण्यात आले. आता कुणाला वाटेल की असा खून होणे हे त्याचेच अपयश आहे; पण आज जगभर त्याचे नाव अजरामर झाले आहे, त्याच्या बायकोचे नाही. म्हणजे इतका काळ लोटल्यावरही त्यांचे नाव आदराने घेतले जात आहे.

जगातील मोठमोठ्या पुरुषांकडे पाहिले तर दिसून येते की, त्यांच्या जवळ अबोधिततेची शक्ति होती. म्हणूनच त्यांचे ध्येय महान होते; त्यांना ध्येयपूर्तीचाच ध्यास होता, बाकी कशाचीच तमा नव्हती. ही उच्च ध्येय संकल्पना अबोधिततेमधूनच निर्माण होते व त्यामुळेच ध्येयपूर्तीसाठी मार्गदर्शनही मिळते; मग त्यासाठी सत्ता, अधिकार ह्या गोष्टी गौण होतात. नाहीतर सत्तेच्या लोभापायी हाहाकार माजवणारे अनेक लोक येतात व जातात पण कुणालाच त्यांची आठवण नको असते. असे थोर पुरुष म्हणजेच अबोधिततेची चालती-बोलती उदाहरणे आणि या अबोधिततेमुळेच त्यांच्या जवळ सूज्ञता पण येते.

**श्रीगणेशांचा मोठा गुण म्हणजे सूज्ञता; त्या सूज्ञतेमुळेच ते नेहमी यशस्वी व्हायचे व त्यांतच त्यांची अबोधितता होती.** कधी कधी निरागस माणसांना आपल्यामधील निरागसतेची ही जाणीव नसते. माणसामधून साध्या-सुध्या, गरीब, कसलाही पदाधिकार नसलेल्या सामान्य माणसांमधूनही-अबोधितता कशी चमकून उठते हे आश्चर्यच आहे. आणि मनुष्यत्वाचे मोठेपण यांतच सामावलेला आहे.

आता अबोधितता कशी मिळवावयाची ते बघू. सर्वप्रथम आपल्या मनात काय काय चालते ते पहात रहा; हे तुमचे तुम्हीच जाणू शकता. त्यालाच आत्मपरिक्षण म्हणतात. हे करत असताना•

आपल्या मनांत कशाबद्दल व कुणाबद्दल प्रतिक्रिया होतआहेत हे लक्षपूर्वक जाणून घ्या; त्यामध्ये अबोधितता आहे की राग आल्यामुळे किंवा न रुचणाऱ्या प्रतिक्रिया आहेत ते समजून घेण्याचा प्रयत्न करा. हे तुम्ही सहजयोगी असल्यामुळे तुम्हाला सहज जमेल. मग अशा प्रतिक्रियांचा तुमच्या वागण्या बोलण्यावर काय परिणाम होत आहे हे जाणून घ्या. **तुम्ही जर खरोखरीच शक्तिशाली असाल तर त्या घटनांना तुम्ही काहीच महत्व देणार नाहीत;** लोक क्षुद्र भावनेमुळे निष्कारण मुर्खपणाने तुमच्याशी तसे वागतात असे समजून त्यांच्याकडे दुर्लक्ष कराल. अशा घटनांवर विचार करण्यातव आपली शक्ति खर्च करण्यात काहीच अर्थ नाही. कधी ना कधी त्यांचाच मूर्खपणा व चूक उघडकीस ये ईल, व त्यांनाच लोक नावे ठेवतील.

जगभरामध्ये अशा वाईट, क्रूर, निर्दयी व अबोधिततेच्या त्यांचा विरोधी कारवाया करणाऱ्यांचा एक गट होतो. असे दुराचारी लोक एकत्र येऊन आक्रमक बनतात आणि दुसऱ्यांना फसवितात. अशा गटांत सैतानी प्रवृतीचेच लोक जमतात. पण असे सैतानी प्रवृत्तीचे लोकही अबोधिततेला धक्का लाऊ शकत नाहीत. नैनं छिन्दन्ति शस्त्राणी नैनं दहति पावकः........न शोषयति मारुतः असे आत्म्याचे जे वर्णन आहे ते अबोधिततेतलाही लागू पडते.अगदी निसर्ग सुध्दा जो एरवी विनाश घडवित असतो तो सुध्दा सर्व जाणतो आणि अबोधिततेचे रक्षण करतो व वेळ आली की तिच्या विरोधात कार्य करणाऱ्या किंवा तिला बदनाम करणाऱ्या सैतानी लोकांना शिक्षा करतो.

म्हणुन सहजयोग्यांनी अबोधिततेचा सदैव आदर व सन्मान केला पाहिजे. तुम्हाला त्रास होईल, लोक तुमच्याशी वाईट तऱ्हेने वागतील किंवा तुम्हाला अस्वस्थ करणाऱ्या गोष्टी घडतील पण अबोधिततेला संभाळलेत की तुम्ही समाधानी, दयाळू व नम्र व्यक्तिमत्व बनाल. म्हणून काळजी घेऊन आपणच आपल्या अबोधिततेला विसरू नका. हिटलरने शेवटी स्वतःच स्वतःचा नाश ओढवून घेतला आणि स्वतःच स्वतःचे नाव मानवी इतिहासातून पुसून टाकले. **म्हणुन अबोधितता बळकट करण्यातच तुमच्या जन्माचे सार्थक आहे;** अबोधिततेच्या शक्तिबद्दल कायम श्रध्दा ठेवा. स्वतःच्या जीवनामध्ये ही शक्ति कशी प्रगट करता; इतरांशी कसे वागता याला म्हणूनच महत्व आहे.त्यासाठीच प्रेम व करुणा यांचा उपयोग केला पाहिजे व त्यासाठीच तुमच्या व्यक्तिमत्वामध्ये अबोधितता प्रस्थापित होऊन तेजस्वी झाली पाहिजे. ही अबोधितताच तुमचा संभाळ करणार आहे, तुमच्यावरच्या संकटांचे निरसन करणार आहे व सहजयोगी म्हणून तुमचे नांव लोकांच्या हृदयात चिरकाल कोरले जाणार आहे.

सर्वांना अनंत आशीर्वाद....

---

सहजयोग हा खूपच पसरला आहे.परंतु त्याची उंची वाढविण्यासाठी आपल्याला आपला दर्जा वाढवायला हवा.त्यामुळे जर काही व्यक्ती उच्च स्थितीला गेल्या, तर इतरही जाऊ लागतील.म्हणजे तुम्ही एकमेकांसाठी हृदय उघडा, म्हणजे तुम्ही माझ्यासाठी तुमचे हृदय उघडाल.

मी निरहंकारी आहे कारण माझ्यात प्रतिक्रिया नाही. जर प्रतिक्रिया नसेल तर अहंकार वाढणार नाही.मी माझ्या शांति व वैभवात राहुन सहजयोग घडवीत असते. मी प्रतिक्रिया व्यक्त करीत नाही. पण तुमच्या प्रतिक्रियाचा मला त्रास होतो.

स्वतःहाच्या आत्म्याच्या पात्रतेबाबत, क्षमतेबाबत, समाधान व वैभव प्राप्त करुन घ्या.इतर लोक तुमच्या पातळीचे नाहीत.तेव्हा त्यांना विसरुन जा.पण त्यामुळे तुम्हाला अहंकार होवु देवु नका.

**प.पू.श्री माताजी निर्मलादेवींनी सहजयोग्यांना दिवाळी निमित्त लिहिलेल्या व अनंत जीवन या हिंदी मासिकात १९७६ मध्ये प्रसिध्द झालेल्या पत्राचा संक्षिप्त अनुवाद.**

निर्मला श्रीवास्तव
२ पार्कलॅन्ड
आईस हाऊसवुड
ऑक्सटेड सुरे

माझ्या प्रिय सहजयोगी मुलांनो,

ही दीपावली आपणा सर्वांना तजोमयी ठरो. जो दिवा तुफानात सुध्दा विझू शकणार नाही, असा आपण सुध्दा एक तेजस्वी दिवा आहात. दिव्यावर तुफानाचा आघात होता, तो विचलीत होतो किंवा विझून जातो तशी आपली मनःस्थिति आहे का याचा विचार करा. दिव्यावर कोणतेही काचेचे आवरण नाही का? आहे. आपल्यावर देखिल एक भक्कम असे आवरण आहे; ज्याच्या पासून कोणत्याही बाह्य शक्तिचा प्रतिकार प्रतिकार तुम्ही करु शकता. ते आवरण म्हणजे आपल्या आईचे प्रेम. माझ्या प्रेमाचे हे आवरण तोमच्या रक्षणासाठीच आहे. भगवान श्रीकृष्णांनी सांगितल्या प्रमाणे -सर्व धर्मानांम परित्यज्य मामेकं शरणं व्रज- किंवा येशूंनी सांगितल्या प्रमाणे-मीच तुमचा मार्ग आहे, मीच द्वार आहे.

मी जर तुम्हाला सांगितले की, तुमचे अंतिम साध्य मी आहे; तर आपण त्यावर विश्वास ठेवाल ? जरी मी काही सांगितले, तरी जे अंतीम सत्य आहे ते रहाणारच. तुम्ही किंवा आपण कोणीही ते बदलू शकणार नाही. हेच अंतीम सत्य तुम्हाला शोधायचे आहे.

ह्या दिवाळीपासून आपणाला अनेक नविन आव्हाने स्विकारायची आहेत. संपूर्ण विश्वाला आव्हान करा. लाखो दीप प्रज्वलीत करा. त्यांच्यात प्रेमरुपाचे तेज भरा, कुंडलिनीरुपी रुईची ज्योत पेटवून त्यांना आत्मसाक्षात्कार द्या. कुंडलिनी रुपी ज्योत उजळेल तेव्हा जगात अनेक न विझणाऱ्या मशाली धगधगतील; माझ्या या मशाली भोंवती निष्कलंक प्रेमाचे अभद्य कवच कायम राहील. या कवचाची मर्यादा अमर्याद असेल. माझी तुमच्यावर सदैव दृष्टी राहील. तुम्हा सर्वांबाबत माझ्या अंतःकरणात अपार प्रेम आहे. ही दिवाळी तुम्हास आनंददायी जावो.

तुमच्यावर सदैव प्रेम करणारी तुमची आई

श्रीनिर्मला देवी.

# संत कबीर

सब्द सब्द बहु अंतरा ।
सार सब्द चित देय ॥
जा सब्दै साहेब मिलै ।
सोइ सब्द गहिलेय ॥

संदर्भावरुन शब्दा शब्दांचे अर्थ वेगवेगळे निघतात. त्यालाच वाच्यार्थ,लक्ष्यार्थ व व्यंगार्थ म्हणतात. म्हणून कबीर सांगतात, "प्रत्येक शब्द दुसऱ्या शब्दापासून वेगळा वाटला तरी फालतु अर्थ न काढता जो सारभूत आहे अशा शब्दावर चित्त केंद्रित करावे. ज्या शब्दामुळे परमेश्वर (साहेब) भेटतो, तोच शब्द मनात नीट पकडून ठेवावा"

बुरा जो देखने मै चला।
बुरा न मिलेया कोय ॥
जो दिल खोजो अपना ।
मुझसे बुरा न कोय ॥

माणसाला दुसऱ्याचे दोष पटकन दिसतात.म्हणुन दुसऱ्याच्या डोळ्यातले कुसळ दिसते,पण स्वःच्या डोळ्यातले मुसळ दिसत नाही, अशी म्हण पडली. त्यावर उपाय म्हणजे आत्मपरीक्षण.म्हणून कबीर सांगतात, "जगात कोण वाईट आहे हे शोधायला निघालो तर मला वाईट कोणी दिसलाच नाही; पण मी स्वतःच्या मनाचा बारकाईने शोध घेतला तेव्हा मला समजले की ,माझ्याहुन कोणीच जास्त वाईट नाही."

साथ त्याजे क्या भया।
मान तजा नही जाय ॥
तेहि माने मुनिवर ठगे।
मान सब को खाय॥

मायेवर (प्रलोभनांवर) विजय मिळवला तरी अहंकार (मान) सुटत नाही तोपर्यंत साधना "सफल होत नाही. या अहंकारामुळेच दुर्वास ऋषी फशी पडले.म्हणून कबीर म्हणतात, माया टाकुन काय मिळणार ? (आत्मोध्दारासाठी ते पुरेसे नाही) उलट त्याचाच अहंकार येतो.हा अहंकारच सर्वनाशाला कारणीभूत (सब को खाय) होतो."

# नवरात्री पुजा

प.पू.श्रीमाताजी निर्मला देवींचे भाषण,(सारांश)
ग्रीस : २१ आक्टोबर २००१

आज आपण देवी पूजा करण्यासाठी इथे जमलो आहोत. देवीची पूजा देवांनी राक्षसांच्या अनाचारांपासुन सुटका होण्यासाठी अनेकवेळा केली आहे. आजही तीच वेळ आली आहे, असेच मला वाटत आहे, कारण आज जगांत कल्पना करता येणार नाही अशी अघोरी कृत्ये करणारे राक्षसी लोक सगळीकडे माजले आहेत आणि त्यांच्या प्रभावाखाली अनेक जण येत आहेत. पण अशा कुठल्याही गोष्टींचा अंत होत असतो हे त्यांच्या लक्षात येत नाही. म्हणून आताची वेळ अशी आहे की सर्व सत्पुरुषांनी व विशेषत: सहजयोग्यांनी महिषासुरासारख्या या राक्षसांना नष्ट करण्याकडे आपापले चित्त पूर्णतया लावले पाहिजे. पूर्वीच्या काळी हे राक्षसलोक उघड उघडपणे राक्षस म्हणूनच वावरत होते. व त्यांच्या आचार- विचारा वरुन ते सहज ओळखून येत असे. पण आजकालचे हे मानव रुपातील राक्षस -त्यांना मानव कसे मानावयाचे हा प्रश्नच आहे. सर्व मानवजातीलाच खत्म करण्याच्या कारवाया करण्यात गुंतले आहेत आणि म्हणूनच त्यांना नाहीसे करण्याची ही वेळ आली आहे.

मी इस्लामच्या विरोधात अजिबात नाही ना मला महम्मद साहेबांवर टीका करावयाची आहे. ते अवतारी पुरुषच होते असे मी मानते;.आणि परमेश्वरी कार्यच त्यानी केले. पण त्यांच्या पंथात पुढे काही मूर्ख लोक घुसले आणि त्यांनी राक्षसी वृत्तीच्या लोकांचा स्वीकार केला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे इस्लाम धर्मीयांमधे चौऱ्याहत्तर पंथाच्या लोकांचा स्वीकार केला आहे. पण सर्वजण म्हणतात की ते एकच धर्म मानतात. हे कसे शक्य आहे? त्या गटांमधेंच काही लोक, "देवबंधी" किंवा " वहाबी"या नावाने ओळखले जातात. मला हे सर्व माहित असण्याचे कारण आमच्या वाड- वडिलांच्या घराण्यामधें काम करणारे नोकर चाकर, स्वयंपाकी ड्रायव्हर वगेरे बरेच मुसलमन होते. त्यातले"वहाबी" लोक तर मोहम्मदसाहेबांनाही मानत नसत, त्यांनी केलेला उपदेशही (वचने)त्यांना मान्य नसे. ते फक्त अल्ला मानतात; पण अल्ला कसा ओळखायचा याची त्यांना काहीच कल्पना नव्हती. तसेच ते फार क्रूर व निर्दयी मनोवृत्तीचे होते.इतके क्रूर की त्यांचे तसले वागणे पाहून माझ्या वडिलांनी त्यांना कामावरुन हाकलून दिले. त्यांचे पूर्वज अफगाणिस्तानातून आलेले; त्यांच्या रक्तातच क्रूरपणा मुरलेला होता. आपल्या बांधवांचाही ते छळ करीत. सगळेच अफगाण लोक वाईट असतात असा याचा अर्थ नाही. काही अफगाण फार चांगल्या स्वभावाचे प्रेमळ, उदार मदत करणारे असे आहेत. पण दुसरे अगदी उलट व क्रूर आहेत. इतर धर्मामधेही काही खराब लोक असतात. पण हे "वाहिबी" लोक संख्येने कमी असले तरी गुप्तपणे त्यांच्या कारवाया चालतात; खरे तर इस्लाम हा त्यांचा धर्म नाहीच. माझ्या वडिलांचा इस्लाम व कुराणाचा खूप अभ्यास होता अणि तेही हेच सांगत; शिवाय त्यांनी हेही सांगून ठेवले होते की, पुढे हेच लोक इतके आक्रमक व भयानक बनतील की, सबंध जगाचा उध्वंस करायला ही ते मागेपुढे पाहणार नाहीत. त्यांच्या कारवाया इतक्या गुप्तपणे चालतील की त्यांच्या हृदयापुढे काय करावे हे समजेनासे होईल.

भारतावर स्वारी करुन आलेला महम्मद शहा हाही एक अत्यंत क्रूर बादशहा होता. मोहम्मद साहेबांना मानणाऱ्या मुसलमानांनाही तो ठार मारत असे. त्याचे म्हणणे होते की, मोहम्मद साहेबांनी स्वत: ला अवतारी म्हणून घोषित केले नसल्यामुळे त्यांचे म्हणणे स्वीकारणे

**मन आणि हृदय पूर्णपणे द्वेषमुक्त केल्यावरच तुमची प्रेमशक्ति कार्यान्वित होणार आहे. प्रत्येक वेळी अधिकाधिक सूक्ष्म व संवेदनक्षम बना. त्यासाठी स्वत:वर ध्यान करा.**

किंवा त्यांची पूजा करणे चूक आहे. मी सुध्दा बरेच वर्षे आदिशक्ति असल्याचे बोलले नव्हते कारण मला अशा मूर्ख लोकांचा संपर्क नको होता. पण नंतर तुम्हालाच चैतन्य लहरीमधून ते समजले. पण मोहम्मद साहेबांना मानणाऱ्यांनाही हे लोक समजू शकले नाहीत आणि त्यांचा क्रूरपणा चालूच राहिला. अशा मूर्ख लोकांना महोम्मदसाहेबां बद्दल काही सांगणे वा पटवणे अशक्यच होते. मोहम्मद साहेब व कुराण न मानणारे हे लोक फक्त "अल्ला" जरूर मानतात. पण त्यांचा"अल्ला" बरोबर काय संबध आहे हे देवच जाणे. पण कसे कोण जाणे त्यांच्या प्रभावाखाली बरेच लोक जमू लागले. अ - गुरु सारखाच हा प्रकार तुम्हाला माहीतच आहे. धर्माच्या नावांखाली पैसे व संपत्ति जमवण्याचे हे सारे धंदे. पण हा सारा भोंदुपणा उघडकीस येऊन हे लोक वठणीवर येणार आहेत. बऱ्याच लोकांचे पितळ उघडकीस आले आहेच. पण त्यावेळी या लोकांच्या गुप्त कारवाया व क्रूर पध्दति इतरांच्या लक्षात आल्या नाहीत.

हे प्रकार बऱ्याच कालावधीपासुन वाढतच आहेत. निजामुद्दीन अवलियाच्या ठिकाणी आपण गेलो असताना तिथे एक मदरसा (शाळा) चालविली जात असल्याचे मीच सर्व प्रथम सांगितले. त्या मदरसांमध्दे लहानपणापासून मुलांना प्रवेश दिला जात असे.खुद्द दिल्लीमधे अशा १२० मदरसा चालविल्या जातात हे कुणाला खरे वाटणार नाही.मी अशीच एकदा निजामुद्दीनला गेले होते; तेव्हा तेथील मुले भजन-गाणी गात होते आणि मला त्यांचा निरागसपणा व प्रेम भावला. पण तेथील व्हायब्रेशन्स चांगली नव्हती. निजामुद्दीन एवढे थोर सत्पुरुष असूनही व्हायब्रेशन्स का नाहीत असे विचारल्यावर तेथे मदरसा असल्याचे सांगितले गेले.

सैतानी प्रवृत्ति कशी चालते हे लक्षात घ्या. सैतानाचे कार्य असेच सूक्ष्मपणे चालते. प्रथम थोडेसे लोक एकत्र येतात आणि युध्द वा कुणालातरी ठार मारण्याचे बेत आखले जातात. क्रौर्य व विध्वंस याच्या पलिकडे त्यांना धर्म नसतो. कसेही करुन क्रूर कृत्ये करण्याशिवाय त्यांना दुसरा विषय नसतो. या मदरसांमध्ये क्रूरता व वैर वृध्दिंगत होण्याचेच पाठ दिले जातात. जगभरातील मदरसांमधे हेच शिक्षण दिले जाते व तसेच लोक तयार केले जातात.

भारत- पाकिस्तान दरम्यान बरेच वेळा युध्दे झाली. पण आता पाकिस्तानच्या लक्षात आले आहे की, अशा युध्दामुळे त्यांनाच दहशतवादी असा ठपका मिळेल. म्हणुन त्यांनी वेगळाच मूर्खपणा केला. मुशर्रफ सत्ताधीश झाल्यावर त्याने पाकिस्तानातील ६५ पंडितांना अफगाणिस्तानात तेथील मदरसांमध्दे क्रूर बनण्याचे व द्वेष भाव निर्माण करण्याचे शिक्षण देण्याची व्यवस्था केली. अर्थात सर्वच मुस्लिम लोक खराब आहेत असा याचा अर्थ नाही. पण मुस्लिम असूनही जे मोहम्मदसाहेबां बद्दल आदर बाळगत नाहीत त्यांचे पुढे काय होणर? अशा तऱ्हेने विचित्र समजुती निर्माण झाल्या आणि इस्लामी लोकांमधे वेगवेगळ्या संघटना उदयास आल्या. हे एक वेळ चालले असते पण मानवप्राण्यांचाच विध्वंस करण्याचे असे धंदे चालवणे फार धोकादायक आहे. मुसलमानी सामान्य जनतेला याची कितपत कल्पना आहे मला माहीत नाही. पण जगभरातील सर्व मदरसांमधे क्रूर मनोवृत्तीचे बेडर लोक तयार केले जात आहेत. याचा प्रथम फटका महिलांना मिळाला. आणि महिलांना अत्यंत निर्दय आणि अनादराची वागणूक दिली गेली. याचाच अर्थ हा होतो की अशा लोकांवर कुणाचेच नियंत्रण राहिलेले नाही. कुराणामधे असे कुठेही लिहिलेले नाही किंवा मोहम्मद साहेबांनीही असे काही सांगितले नाही, ते तर म्हणायचे की परमेश्वर दयाळु व शांति देणारा आहे. त्यांनी जीवनभर परमेश्वरी कार्यच केले यात शंकाच नाही. पण वर उल्लेखलेल्या काही लोकांनी सैतानी शक्तीचा पुरस्कार केला आणि इस्लामबद्दल गैरसमज निर्माण झाले.

इस्लाम म्हणजे शरणागति. तुम्ही लोक त्या दृष्टीने शरणागत आहात; **शरणागत म्हणजे हव्यास, लोभ इ.षडरिपुंपासून सुटका झालेले व सामान्य माणसांपेक्षा वरच्या दर्जाचे लोक.** मोहम्मदसाहेबांनी हे पण सागितले आहे की,उध्दाराचा समय येइल तेंव्हा तुमचे हात बोलू लागतील, पण ही काव्यात्मक भाषा लोक समजू शकले नाहीत आणि कांहीजणांनी त्याचा विपर्यास केला.आजकालच्या मॉडर्न जमान्यात लोकांच्या मनात विकृत कल्पना येऊ लागल्या आहेत आणि विरोध करण्याची प्रवृत्ति वाढत आहे.ज्यू लोक म्हणूनच विरोधात आहेत आणि हा विरोधच द्वेषभावना पसरवीत आहे.

सहजयोगामध्ये निरागसता मानली जाते आणि सहजीवनाला महत्व दिले जाते. अशा परिस्थितीत आपण प्रथम आत्मपरीक्षण केले पाहीजे. हिंदु सहजयोग्याने दुसरा माणूस केवळ मुसलमान आहे म्हणून आपल्याला आवडत नाही का हे स्वत:शीच तपासले पाहिजे. शरणागत झाल्यावर तुमच्या मनांत द्वेषभावनेला थाराच मिळता कामा नये. या चुकीच्या कल्पना तुम्ही पूर्णपणे टाकून दिल्या पाहिजेत. समजा तुम्ही हिंदू आहात, तरीही दुसऱ्या धर्माच्या माणसाचा धिक्कार करण्याचा तुम्हाला मुळीच आधिकार नाही. खंर तर हिंदू हा शब्दच सिंधू नदी नांवावरुन आला आहे. अलेक्झांडर बादशहा जेव्हां सिंधू नदी पार करुन

आला तेव्हा तेथील लोकांना, सिंधू शब्द उच्चारता न आल्यामुळे "हिंदू" म्हणु लागला व हिंदू शब्द रुढ झाला. पण इथल्या कांही लोकांनी त्याला लाक्षणिक अर्थ दिला व भेदा- भेदाची भावना निर्माण केली तरी सुदैवाने त्याच्यामागे क्रूर-पणाची वृत्ति नव्हती हे नशीब. द्वेषभावनेतून दुसऱ्याचा छळ करण्याची प्रवृत्ति फार घातक आहे.

माणसे माणसांचा द्वेष करु शकतात हा विचारच माझ्या हृदयाला वेदना देतो. **प्रेम करण्यासारखी दुसरी आनंददायक व सुंदर भावनाच नाही.** काही विघातक मंडळींनी खाटे नाटे सांगुन, लोकांवर प्रभाव पाडून ही द्वेषभावना त्यांच्या डोक्यात भरवलेली असते. पुढे त्यातून काय होणार आहे मला समजतच नाही. म्हणूनच त्या काळी देवीलाच राक्षसांना ठार मारावे लागले. आमिबापासून परमेश्वराने उत्क्रांतीच्या प्रवासात मानव निर्माण केला तोच मानव दुसऱ्या मानवाचा द्वेष करु शकतो हे दुर्दैव. हे कसे शक्य आहे असे वाटले तरी ते प्रत्यक्ष घडत आहे.

सहजयोग्यांची गोष्ट वेगळी; कारण त्यांना प्रेमाचा आनंद समजला आहे आणि त्यांतच ते रममाण होतात. तुम्ही ते प्रत्यक्ष पहातच आहांत. तुम्ही कसेही करुन **माणसा- माणसा मधील ही द्वेष भावना दूर करुन त्याचे प्रेमात रूपांतर करु शकलात तर फार मोठे कार्य होईल.त्यासाठी तुम्हाला इच्छाशक्ति *पणाला लावावी लागेल*** आणि माणसांना खोट्या-नाट्या अपप्रचारातुन गैरमार्गाकडे नेणाऱ्या तत्त्वप्रणालींचा धिक्कार करावा लागेल. हे महा कठिण काम आहे.मानवी जीवनाची ही परिस्थिति पाहून माझ्या हृदयाला अपरंपार वेदना होतात आणि कोणत्या परिस्थितीत आपल्याला ह्या पृथ्वीवर जन्म घ्यावा लागला असे होऊ जाते. माणूस या सैतानी प्रवृत्तीमुळे किती अधोगतीला जाऊ शकतो हे मी पाहिले आहे; त्या गोष्टी मी बोलू लागले तर तुम्हाला धक्काच बसेल. म्हणून स्वत:ला नीट समजून व पारखून ***आपल्या मनात कोणाबद्दलही द्वेष भावनेचे किल्मिश उरणार नाही याची काळजी घ्या.*** अशा कुजक्या भावना मनात बाळगणारा माणुस पशूच म्हणावा लागेल. पण हेच प्रत्यक्ष होत आहे व दिसून येत आहे. उदा.तुम्ही गरीब असला तर काय बिघडले? श्रीमंत माणसाचा द्वेष करुन तुम्हाला संपत्ति मिळत नसते. कांही अडचणी असतील तर त्या दूर करण्याचा प्रयत्न करणेच हितावह असते; त्यांचे भांडवल करणे चुकिचेच असते. या सर्व वाईट प्रवृत्ति नष्ट व्हायलाच हव्या. **म्हणून आपण काय करत आहोत, कोठे चाललो आहोत, याचे सदैव भान असले पाहिजे.** कुणाबद्दल जर काही गैरसमज मनात असतील तर ते पुर्णपणे दूर करणे



आवश्यक आहे. कुणी त्रास देत असला तर असू देत, पण त्याच्याबद्दल मनात किंतु ठेवु नका; तो आहे तसेच त्याच्याकडे पहा पण स्वत:चे मन दूषित होऊ देऊ नका.

सहजयोगाचे कार्य किती महत्वाचे आहे हे आजपर्यंत माझ्या लक्षात आले नव्हते. तुम्ही बारीक सारीक फालतु गोष्टींकडे लक्ष न देता आपल्या स्वत:मधे व आपल्या आचार-विचारामधे काय चालले आहे इकडे लक्ष द्या. सध्याचे वातावरणच इतके खराब व गढुळ आहे की सहजयोग्यांनी काय करावे हाच प्रश्न कधी माझ्या मनात येतो. म्हणून स्वत:चेच परखडपणे आत्मपरिक्षण करुन आपण चांगले वा चुकिचे काय करत आहोत हे लक्षात घ्या. हे समजण्यासाठीही तुम्हाला चांगला फटका मिळाला पाहिजे. आपण पूजा, प्रोग्राम इ. सर्व करतो ते ठीक आहे, पण माझ्या अंतकरणाबद्दल म्हणाल तर आंतुन मी फार दु:खी आहे. म्हणून सहजयोगी म्हणून कमीत-कमी **तुम्ही स्वत:कडेच पूर्ण चित्त लावा. सहजी लोक कधी कधी सहजाचा आनंद जरुर लुटतात पण आजुबाजुला व इतरत्र काय चालले आहे याबाबत बेफिकीर होतात.** तुम्ही आपल्यामधेच काय कमी आहे व तो कमीपणा प्रामाणिकमणे दूर करण्याचा प्रयत्न करतो का हे तपासत रहा. म्हणून मला म्हणवेसे वाटते की तुम्ही स्वत:वरच ध्यान करा.

सध्या सर्व मानव जातीवरच एक महान संकट ठाकले आहे. त्यांतून सुटका करावयाचा सहजयोग्यांकडे एकच मार्ग आहे आणि तो

म्हणजे त्यांची प्रेम शक्ति. ते तुम्हाला शक्य आहे पण त्यासाठी तुम्ही तुमचे हृदय स्वच्छ व सक्षम बनवा. आपल्या प्रत्येकाला स्वत:मधे ही प्रेमशक्ति जोपासण्याची व कार्यान्वित करण्याची सध्याचा बिकट काळ ही एक संधि आहे असे समजा. आपले मन व हृदय द्वेषमुक्त करा म्हणजे ही प्रेमशक्ति तुमच्यामध्ये कार्यान्वित होईल आणि ह्या **प्रेमशक्तिचा प्रकाश तुम्हाला मिळाला की तुम्ही माझ्यासाठी किती शक्तिशाली बनू शकता हे पाहुन तुम्हालाच आश्चर्य वाटेल.** मी एकट्याने ही लढाई करु शकत नाही. मला असे प्रेमशक्ति प्रखर असलेले लोक हावेत. बाकी काही नको. जगभरातील सर्व सहजयोग्यासमोर हे एक आव्हान आहे. हे सहजयोगी व असहजयोगी किंवा आस्तिक व नास्तिकामधील युध्द नसून आपण सर्वजण एक होऊन ही लढाई करणार आहोत व जिंकणार पण आहोत. **प्रत्येक वेळी तुम्ही आधिकाधिक सूक्ष्म व संवेदनक्षम बनले पाहिजे.** आजच्या परिस्थितीत हे सर्व नीट लक्षांत घेणे फार आवश्यक आहे, तसेच आपण या सैतानी वातावरणाचाच एक अंश बनून जाणार का तसे न होता त्याचा नाश करण्यासाठी लढायला सिध्द होणार हेहि तुम्हीच ठरवायचे आहे. ही लढाई प्रदीर्घ व कठीण असली तरी त्याचा शेवट होणारच आहे. ही लढाई आपल्याला राक्षसांबरोबर करायची आहे आणि त्यानंतर मानवजातीला अशा संकटांना व क्रूर प्रवृत्तींना पुन्हा सामोरे जाण्याची वेळ येणार नाही. या सैतानी मंडळींना साथ देणाऱ्या लोकांना हे समजून सांगितले पाहिजे. तुम्हाला वाटेल की असे लोक कसे ओळखायचे? पण तुम्ही सहजयोगी असल्यामुळे तुम्हाला ते जमेल व माहीतही आहे. मला खात्री आहे की सहजयोगीच त्यांना सन्मार्गावर आणू शकतील व वाचवतील. फक्त या सैतनी लोकांच्या भुलथापांना बळी पडु नका.

**मला हे सर्व तुमच्या हृदयांत अगदी खोलवर रुजवायचे आहे.** तसे ते बिंबवले की, पुढच्या भयानक धोक्याची तुंम्हाला जाणीव होईल. या सैतानी कारवाया संपवल्या नाहीत तर कुणी सांगावे एकही माणूस वा मूल पृथ्वीवर उरणार नाही. हा विचार माझ्या मनात आला की माझाच थरकाप येतो. म्हणून जागरुक राहुन आजुबाजुला, अगदी कानकोपऱ्यातही, काय चालले आहे, क्रूर कृत्यांच्या कोण गप्पा करत आहेत इकडे लक्ष घा.

माझ्यासमोर या भयंकर युध्दाचा फार कठीण प्रसंग आहे पण तुम्ही सर्व जण एकजूट होऊन माझ्या बरोबर राहिलात तरच आपल्याला यश मिळणार आहे. **माझा सर्व भार आता तुमच्यावर आहे** आणि त्यासाठी तुम्ही कटिबध्द झाले पाहिजे. नुसती माहिती मिळवून व गप्पा मारुन कांही मिळणार नाही तर तुमची प्रेमशक्ति कार्यान्वित झाली पाहिजे.

सहस्त्रार उघडल्यामुळे तुम्ही सर्व जण तयार व्हाल व कार्याला लागाल ही माझी खात्री आहे. तुमची प्रत्येक गोष्ट प्रेमामधून प्रेरित झाली पाहिजे. हा फार गहन विषय आहे आणि एक पाय आत तर एक पाय बाहेर असे करुन चालणार नाही. तुमची प्रेमशक्तीच या सैतनी कारवाया रोखू शकेल. सहजयोग्यांची एक नवी पिढी तयार होत आहे. तुम्हा सर्वांना मी माझ्या हृदयांत सामावून घेतले आहे आणि माझे पूर्ण आशीर्वाद तुमच्या पाठीशी आहेत. मी तुमच्यावर सदैव प्रेमच करीत आली आहे; म्हणून तुम्ही सर्वजण शूर शिपायांसारखे माझ्याबरोबर या लढाईत उतरा. आपसातले मतभेद बाजूला ठेवुन संपूर्ण एकजूटीनें प्रेम व शांतीचे शिपाई म्हणून कर्याला लागा.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

सत्याचा आनंद घेण्यास धैर्य लागते. काही वेळेस लोक तुमची टवाळी करतील, हसतील, कदाचीत त्रास देतील, परंतु त्याची तुम्हाला काळजी नसावी कारण तुमचे नाते परमेश्वरी नियमांशी, परमेश्वराच्या कृपेशी आहे. तुम्ही त्याच्याशी सलग्न झाल्यावर इतरांच्या बद्दल आणि त्यांना काय म्हणायचे आहे याची फिकीर करु नये. तुम्ही उभे राहुन स्वत:ला सत्याने सुशोभित करायला हवे आणि लोकांशी बोलायला हवे. मग लोकांना समजेल की, तुम्हाला सत्य मिळाले आहे.

पुर्व प्रदेशामधील या वर्षीचा सहजयोग सेमिनार हुगळी जिल्ह्यातील हमीरागाची या गावातील मलिया या ठिकाणी दि.२९सप्टें. ते २ आक्टो.२००१ या दिवसात नुकताच संपन्न झाला. सुमारे ५०० सहजयोगी बंधु-भगिनी उपथित होते. निवासाची व्यवस्था काशी विश्वनाथ सेवा-संस्थेच्या आवारात केली होती. शहरी वस्तीपासून दूर असलेल्या या ग्रामीण परिसरांतील वातावरण सेमिनारसाठी योग्यच होते.

# पूर्व विभाग सहजयोग सेमिनार २००१

दि.२९ सप्टेंबर ते २ अक्टोबर २००१

दि.२९ सप्टेंबर -

सकाळच्या न्याहरीनंतर सर्व सहजयोगी सजविलेल्या एका हॉलमधे जमले. संपूर्ण हॉल फुलांच्या माळांनी सुशोभित केला होता. स्टेजवर श्रीमाताजींची प्रतिमा व चरणकमल ठेवण्यात आले होते. मागीलबाजुस डेकोरेशन आकर्षक केलेले हाते. स्टेज समोर खाली होमकुंड मांडण्यात आले होते. कलकत्याच्या युवाशक्तिने म्हणलेल्या-हेमजा सुतम भजे-या गणेश भजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर श्री अरुण गोयल यांनी, हवनाबाबत, त्यातील सूक्ष्म गहनता व त्यामागील हेतू याबाबत थोडक्यात माहिती सांगितली. तसेच हवन सामग्री व हवन मंत्र याविषयी मार्गदर्शन केले. सुरुवातीला श्री गणेश अथवशीर्ष नंतर यज्ञदेवता व अग्नीदेवतेच्या मंत्रोच्याराने अग्निकुंड प्रज्वलीत करण्यात आले. नंतर श्रीगणेशांच्या १२ नाममंत्राने व नंतर एकादशरुद्रांच्या ११ नाम मंत्राने हवन विधि झाला. सर्व विधीतील बाधा व राक्षसांचा विनाशाचे मंत्र घेऊन पूर्णाहुती देण्यात आली. आरती नंतर सकळचे सत्र संपले.

दुपारच्या जेवणानंतरचे सत्र दु. ३.३० वा सुरु झाले. प्रथम कलकत्याचे लीडरांनी श्री अरुण गोयल यांना सर्व सेमिनारचे सूत्रसंचलन करण्याची श्री हिमानसू शहा व श्री करुन सांगवी यांनी श्री अरुण गोयल यांना विनंति केली. श्री अरुण गोयल यांनी आपल्या भाषणात सहजयोगांकरीता श्रीमाताजींचे झालेले अवतरण, सहजयोगाची महता, त्याची व्यापकता, वैशिष्ट्ये व श्रीमाताजींच्या अपेक्षा यावर अगदी त्यांच्या नेहमीच्या खुमासादार शैलीत विवेचन केले . त्यांची सुमधुर वाणी सर्व ऐकत होते.

सायं.५.३० ला चहापानानंतर सर्व हॉलमध्ये संगीतसंध्येच्या कार्यक्रमासाठी जमले. सुरुवात कलकत्याच्या युवाशक्तिने हेमजा सुतम भजे या भजनाने केली. आनंदीता बोस यांनी गायलेल्या या भजनास पेटींवर सोनीया मुखर्जी व तबल्यावर अशोक दत्ता यांनी साथ केलीअशोक दत्ता यांनी आपल्या तबलावादनाने सर्वाचे चित्त वेधून घेतले. यानंतर भस्मासुरावर आधारित पौराणिक कथेवर रचलेली एक नाटिका सादर करण्यात आली. विष्णूकडून मोहिनीच्या रुपात या भस्मासुराच्या झालल्या वधाचे दृष्य पाहून सर्व वातावरण अधिकच चैतन्यमय झाले. ही सुंदर नाटिका पुणे कलेक्टिव्हीटी तर्फे सादर करण्यात आली. भोजनानंतर पहिल्या दिवसाचे सत्र संपले.

रविवार दि.३० सप्टेंबर

दुसऱ्या दिवसाचे रविवारचे सत्र सकाळी ६.३० वा च्या सामुहिक ध्यानाने सुरु झाले. ध्यानानंतर सामुहिक जोडेपट्टी व विशुद्धीच्या स्वच्छतेसाठी -अल्ला हु अकबर- हा मंत्र घेण्यात आला.

सकाळचे सत्र न्याहरीनंतर सुरु झाले. यावळी ध्यानाचे महत्व व त्यातून होणारे

आत्मपरिक्षण, श्रीमाताजींच्या अवतरणाचे महत्व व शरीरशुध्दीसाठी करावयाचे उपचार यावर श्री अरुण गोयल यांनी माहिती दिली. यात मुख्य: परमचैतन्य व स्वाधिष्ठान चक्र यांच्या संबंधातुन आपल्याला स्वर व शब्द प्रतित करण्यासाठी मिळालेली शक्ति व त्याचा सहजयोग प्रसारासाठी होणारा वापर, नंतर श्रीमाताजींचे अवतरण पृथ्वीवर कसे झाले व त्याचे वैशिष्ट्य, कलियुग व नल-कलीचा झालेला संवाद व शेवटी सहजयोगातील उपचार पध्दति यावर त्यांनी आपल्या चैतन्ययुक्त रसाळ भाषेत संदिग्धपणे माहिती दिली. यानंतर अरुण गोयल यांनी सहजयोग्यांनी पुढे येऊन काही विषेश असे आलेले अनुभव सांगण्यासाठी आव्हान केले, त्यानंतर काहींनी आपले अनुभव सांगीतले.

जेवणानंतरच्या सत्रात पुन्हा श्री अरुण गोयल यांनी प्रोटोकॅालबाबत आपले विचार व त्यांचे पालन या बाबत मार्गदर्शन केले. नंतर त्यांनी ध्यान, आत्मनिरीक्षण, आपले लक्ष व निर्विचारता यावर भाषण केले. तसेच आपण स्वत:ला स्वच्छ ठेवुन असणारे दोष सहजयोगपद्दतीने काढणे व आपण सहजयोगाचे एक साधक कसे होतो यावर सुरेखपणे मार्गदर्शन केले. त्यानंतर एका सहजयोग्याच्या विनंतीवरुन आपण सहजयोगात कसे आलो व एका जीवघेण्या रोगापसून कसे बचावलो व सहजयोगात झालेले परिवर्तन व नंतर पूर्ण समर्पण यावर त्यांनी आपल्या सहजजीवनावर प्रकाश टाकला.

चहानंतरच्या सायंकाळच्या संगीत संध्येत प्रथम कलकत्ता युवाशक्तिने आपली भजने सादर केली. नंतर दोन सहजयागिनींनी आपल्या मधुर आवाजात आणखी काही भजने सादर केली. त्यानंतर आधुनिक युगातील राक्षस व अगुरु यावर आधारीत 'महिशासुर' नावाची एक नाटिका कलकत्याच्या युवाशक्तिने विनोदीपध्दतीने आकर्षकरीत्या सादर केली.

भोजनानंतर ज्यांची उत्सुकतेने वाट पहात होते त्या श्री अरुण आपटेंचे मंचावर आगमन झाले. प्रथम त्यांनी राग व सुरांचा संबंध तसेच स्वर, लय, नाद यांचे होणारे एकत्रीकरण व त्यातून होणारा स्वरांचा आविष्कार व इतर महत्वाची माहिती सांगीतली. नंतर चक्रांच्या क्रमानुसार त्यावर आधारित रागांचा मधुर स्वरांत आपल्या नेहमीच्या पध्द्तीने एकएक भजने सादर केली. त्यामुळे अधिक अधिक चैतन्य वाढत जाऊन गाण्यची रंगत वाढली. त्यांना अशोक दत्ता यांनी तबल्यावर सुरेख साथ दिली व गाण्याची रंगत वाढविली. रात्री ११.०० कार्यक्रम संपल्यानंतर सर्वांनी भोजन घेतले.

तिसऱ्या दिवशी १ आक्टोब २००१सोमवार रोजी सेमिनारची सुरुवात सकाळच्या ६ ते ७ च्या ध्यानाने झाली. नंतर पहिल्यासत्रासाठी सर्व जण मुख्य सभामंडपात आले. सुरुवातीला अरुण गोयल यांनी पुन्हा सहजयोगाची आवश्यक्ता व फायदे यावर विचार प्रदर्शित केले. नंतर विश्वातील चक्रांची स्थाने व त्यांची वैशिष्ठ्ये व त्याची जपणूक व योग्य पोषण यावर भाषण केले विशेषत: कलकत्ता व युवाशक्ति व तेथील सहजयोग्यांची जबाबदारी यावर त्यांनी प्रकाश टाकला. त्यानंतर सर्व सहजयोग्यांना एका रांगेत बसवून एकमेकांना चैतन्यलहरी देऊन चक्रे कशी ठीक करावयाची व कुंडलिनी चढविणे यावर छोटी कार्यशाळा घेतली. त्यामुळे नविन लोकांना याचा खूपच फायदा झाला. त्यानंतर प्रश्नोतराचे सत्र घेण्यात आले. प्रोटोकॅाल,बाधा व चक्रांवरिल पकड इ.विषयांवर प्रश्नोत्तरे झाली. श्री अरुण गोयल यांनी अगदी सर्मपकपणे उत्तरे दिली. त्यावेळी श्री करुण संगी यांनी बंगालीत निराकारण केले. शेवटी आरतीचे शब्दोच्चार, वेग यासाठी श्री अरुण आपटे यांनी स्वत:आरती म्ह्टली व मंत्र कसे म्हणावे यावर मार्गदर्शन केले.त्याचबरोबर सकाळचे सत्र संपले.

दुपारच्या भोजनानंतर ३.३० वा. युवाशक्तिसाठी एक कार्यशाळा आयोजित केली होती. त्यावेळी युवाशक्तिकडुन सहजयोग व त्यांच्या कार्या विषयी असणाऱ्या अपेक्षा यावर विचार मंथन झाले.

संध्याकाळचे सत्र ६.३० वा. ' आवाज उठायेंगे' च्या गाण्याने सुरु झाले. त्यानंतर तारकेश्वर येथील सहजयोग्यांनी ' चेतना' नावाची नाटिका सादर केली. त्यानंतर जमशेठपुरच्या बालगणेशांनी एक भजनाचा कार्यक्रम सादर केला. नंतर रांचीच्या गृपने श्रीजगदंबे आई रे- हे भजन मोठ्या जोशात सादर केले व सर्वांना नाचायला लावले. त्यानंतर श्री अरुण आपटे यांना मंचावर येण्याची विनंती करण्यात आली.व त्यांच्या गाण्याने सेमिनारची सांगता करण्यास सांगण्यात आले. त्यांनी संगीतातील स्वर, राग व ताल याविषयी सविस्तर माहिती दिली. लोकांनाही आपल्यावरोबर गाण्यास सांगितले. अथवर्शीर्ष कसे म्ह्णावयाचे याबाबत मार्गदर्शन केले. पूजेत गायली जाणारी भजने गायली व त्याविषयी मार्गदर्श्न केले. नंतर एकापाठोपाठ अशी रागातील, कृपा करो माताजी तूही भवानी, सय्या निकस गये इ.भजने गाऊन कार्यक्रमाचा उच्चांक गाठला. त्यांना तबल्याला साथ अशोक दत्त यांनी केली अशा तऱ्हेने सेमिनार ची सांगता झाली.

सर्व संयोजकांचे अभिनंदन

# अमृत वाणी

प.पु श्रीमाताजींची प्रवचने व पूजाप्रसंगीची भाषणे म्हणजे अमृत धाराच असतात.त्याचे जितके पारायण करावे तितका त्यांतील सूक्ष्म आशय ध्यानात येतो. या अनेक प्रवचनांतील गर्भार्थ, अवतरणे "अमृतवाणी" सदरांत सादर केली जातात.

आपला स्वभाव, व्यवहार, वागणुक व गुण असे व्हावयाला हवेत की, नाद, माधुर्यता प्रतिबिंबित होईल. आपले बोलणे सुध्दा नेहमी नादमधुर असावयास हवे.

आपल्या नेहमीच्या वागणुकीतही प्रेमळपणा, मधुरता असायला हवी.हीच शक्ति आहे. तुमचे संबंध इतके आपुलकीचे हवेत की, त्यातून खूप आनंद व समाधान पसरले पाहिजे.

निसर्गातील हिरवळ, झाडांकडे बघत राहण्याची सवय करा.म्हणजे तुम्हीपण शांत सुंदर व्हाल.दुसऱ्याशी बोलताना, त्या व्यक्तिकडे ही शांतता पोहचवा. आता तुम्हाला जे मिळले आहे त्याचा आनंद घ्या.

धार्मिक व विधायक गोष्टी समजणे हे आपल्याला फार महत्वपुर्ण आहे. माझे चित्त कोठे जात आहे. जी वस्तुस्थिती आहे त्यापेक्षा काही निराळे सांगत आहे का?, कां ते काही विरुध्द सांगत आहे आपल्याला फक्त याच्यावर लक्ष ठेवले पाहिजे.

जर तुम्ही दररोज ध्यान धारणा केलीत आणि सहस्त्राराचे तुमच्या अंतरंगावर होणारे परिणाम जाणलेत, तसेच तुमच्या आयुष्यातील घटनांमध्दे भाग घेतलात, तर सहजयोग्यांच्या सर्व शक्ति प्रगट होतील व तुम्हाला तुमच्याबद्दल कोणतीच शंका घेण्याचे कारण उरणार नाही. तसेच दुसरेही शंका काढणार नाहीत.

आता तुम्ही हे सत्य प्रगट सांगू शकता की ,तुम्ही आत्मसाक्षात्कारी जीव आहात,सर्वत्र वास करत असलेल्या ईश्वरी शक्तीची तुम्हाला जाणीव झाली आहे. तुम्ही दुसऱ्याला आत्मसाक्षात्कार देऊ शकता. सत्याचा स्वीकार करुन तुम्ही सत्यामधे काही भर घालत नाही तर स्वतःला सुशोभित करता.



दहा गुरुंचे अवतरण

# लाओ त्से

लाओत्से यांच्या जीवनकालाबद्दल अधिकृत माहिती उपलब्ध नाही. त्याचा जन्म ख्रि.पू.६०४ चे सुमारास चीन मध्ये झाला असे मानले जाते. असेही म्हटले जाते की, एका दिव्य ताऱ्याच्या शक्तिमधुन त्यांचा गर्भ प्रवेश झाला आणि त्यांच्या अलौकिक शक्तिमुळे, सत्तर वर्ष ते प्रगट झाले नाहीत. लाओत्से (वृध्द गुरु) या नावावरुन हेच ध्वनित होते.

ते स्वभावाने अत्यंत शांत, विचारी आणि कष्टाळु होते. त्या काळच्या समाज रुढीप्रमाणेच त्यांनी जीवन व्यतीत केले. प्रामाणिकपणा व विश्वासर्हता या सद्गुणांमुळेच लहानवयातच ते लोकांमध्ये आपलेपणा मिळवीत गेले. राजदरबारात त्यांच्यावर खजिन्याची जबाबदारी सोपवण्यात आली; आणि ती त्यांनी समर्थपणे सांभाळली. पण त्यांच्या जीवनाबद्दलचा उत्साह आणि अग्रेसरपणा त्यांनी केलेल्या शिकवणुकीमधून व तत्वप्रणालीमधून दिसुन येतो. त्यांची विद्वत्ता पाहून हजारोंनी तरुण त्यांच्या जवळ शिकले. त्यांच्या या नावलौकिकामुळेच पुढे कन्फूशियस त्यांना भेटायला आला.

दरबारी खजिना सांभाळताना त्यांना दिसून आले की, प्रजेकडून घेण्यात येणारा कर-महसूल राजघराण्याच्या श्रीमंती राहणीवरच खर्च होत असे. त्यांच्या अंत:करणाला हे योग्य वाटले नाही. पण बोलून दाखवण्याची ही गोष्ट नसल्यामुळे त्यांनी आपल्यामध्येच याचा शोध घेण्यास सुरुवात केली, आणि त्यातूनच मानवी जीवनाबद्दलच्या मूलभूत तत्त्वांचा त्यांना बोध झाला. त्याच बरोबर राजे लोकांना प्राप्त न झालेल्या आंतरिक शांतीची त्यांना अनुभूति मिळाली; सामाजिक पुन:रुथानाची त्यांना एक दिशा मिळाली. पण त्यांची ही शिकवण त्या काळच्या परिस्थितीत लोकांना समजली नाही. त्याचा परिणाम म्हणून त्यांच्याकडे शिकणाऱ्यांची संख्या हळु हळु कमी होऊ लागली. त्यांच्या तत्त्वज्ञानाची गहनता कुणाच्याच लक्षात न आल्यामुळे त्यांनी राजदरबारातील पद सोडून दिले देशातून व समाजापासून दूर निघून जाण्याचे ठरविले. त्यानंतरच्या जीवनाच्या उतरत्या काळात त्यांनी आपले तत्त्वज्ञान लिखीत केले. या तत्वज्ञानालाच Tao Te Ching म्हणतात.

या तत्त्वज्ञानाप्रमाणे सृष्टीच्या सर्व घटनांच्या मागे एक निराकार, सर्वव्यापी, अविनाशी,चिरंतन सत्ता आहे व त्यालाच त्यांनी Tao असे नाव दिले.त्यांच्या निर्वाणानंतर आलेल्या ' चुआंग त्से' या तत्वज्ञाने याचा अभ्यास केल्यावर असा सिध्दांत मांडला "Tao स्वयंनिर्मित आहे पण सृष्टीमध्ये Tao नाही अशी एकही वस्तु नाही".

लाओत्सेचे कांही उपदेश :

- तुमच्या शत्रुवरही प्रेम करा.
- जो दुसऱ्याला पराजित करतो तो पराक्रमी असतो;जो स्वतःला जिंकतो तो बलशाली असतो.
- संतानवळ कसलाही अतिरेक,बडेजाव,अवडंबर वा अभिमान नसतो
- Tao च्या कृपेमुळे नि:शस्त्र माणूस केवळ आपल्या अध्यात्मिक बळावर कुणालाही नमवू शकतो.
- मानव धरतीच्या नियमानुसार जगतो.पृथ्वी स्वर्गाच्या नियमांखाली आहे आणि स्वर्ग Tao च्या नियमाखाली आहे पण प्रत्यक्ष Tao सहज आहे.

# प.पू. श्री माताजी निर्मलादेवींना जगभरात मिळालेले किताब, मान सन्मान

१) न्यूयॉर्क १९९४ : प. पू.श्रीमाताजी निर्मला देवींच्या स्वागतपर पोलिस परेडचे आयोजन व मानवंदना.

२) ब्रिटिश कोलंबिया १९९४ : कॅनेडीयन जनतेच्या वतीने प्रिमीयर प्रोव्हीस ब्रिटीश कोलंबियाने स्वागत पर राजपत्र.

३) लॉस एंजेलिस १९९३ व १९९४ : महापौरांकडुन लॉस एंजलिस जनतेच्या वतीने सन्मानपत्र सातत्याने प्रदान.

४) फिलाडेल्फिया १९९३ : १५ आक्टोबर श्रीमाताजी निर्मलादेवी दिन म्हणून साजरा करण्यात येतो.

५) सिनसीनाती १९९२ -१० सप्टेंबर श्रीमाताजी निर्मलादेवी दिन म्हणुन पाळला जातो.

**संयुक्त राष्ट्र संघ**

१) जागतीक महिला परिषदेस सन्माननिय अतिथी-बिजींग १९९५

२) सातत्याने १९८९ ते १९९४ या कालावधित विश्वशांती विषयी मार्गदर्शन पर कार्यक्रम.

**रशिया**

१) सेंट पिटर्सबर्ग १९९३ : ऑईनस्टाईन नंतर पेट्रोयास्कास कला व विज्ञान ॲकॅडमिचे सन्माननिय सदस्यत्व.

२) सेंट पिटर्सबर्ग १९९३ : आंतराष्ट्रीय वैधक शास्त्र व अध्यात्म विषयक परिषदेचे उदघाटक व प्रमुख अतिथी.

३) सेंट पिटसबर्ग १९८९ : रशियन आरोग्यमंत्री व प्रमुख आरोग्य मंत्रालय वार्तालाप बैठक-सहजयोग एक वैज्ञानिक मार्ग संशोधनास शासकीय मान्यता.

**आंतराष्ट्रीय अचिवमेंटस**

१) भारत -महाराष्ट्र - नवी मुंबई -११ ऑगस्ट १९९७ - प.पु श्री माताजी निर्मलादेवी मार्ग म्हणून मान्यता व प्रमुख रस्ताचे नामकरण

२) भारत १९९७ युनिटी इंटरनॅशनल पिस अवार्ड

३) रुमानिया १९९५ डॉक्टरेट प्रदान

४) चीन १९९४ चीन शासनाने आमंत्रीत

५) ब्राझिल १९९४ -महापौरांकडून स्वागत व सर्व कार्यक्रम अनुदानित,शहराची चावी प्रदान

६) इटली १९९६ इटालियन शासनानए पर्सनॅलिटी ऑफ द इयर म्हणून सन्मानित.

७) श्रीमाताजींनी स्वातंत्र चळवळीत गांधीजींच्या बरोबर काम केले.आत्मसिध्दीसाठी ८५ देशात सहजयोगाच्या शाखा सुरु केल्या आहेत. १९८९ मध्ये श्रीमाताजींना संयुक्त राष्ट्रसंघाचा, शांती, पुरस्कार देण्यात आला होता.

८) दि.२५ फेब्रुवरी २००१ श्री माताजीनिर्मलादेवीं यांना ,इंडियन कौन्सिल ऑफ मॅनेजमेंट एक्झीक्युटिव्ह (आयसीएमई) वतीने, -मानव रत्न व मातोश्री सन्मान नाम व सुवर्णपदक अर्पण करण्यात आले.

## सहजयोग - संशोधन

१) मानवी शरीरावरील सहजयोजाचे परिणाम -डॉ.संदीप सेठी सहजयोगाने कुंडलिनी -जागृतीचे फिजीयालॉजिकल परिणाम डॉक्टर ऑफ मेडिसीन साठी प्रबंध दिल्ली विध्यापीठाकडून मान्यता, दिल्ली १९८६

२) उच्च रक्तदाबामध्दे सहजयोगाची भूमिका -दिपक चुग -सहजयोग पध्दतीचे परिणाम -एम.डी.साठी प्रबंध-दिली विध्यापीठा कडून मान्यता १९८७

३) दम्याच्य उपचारात सहजयोगाची भूमिका -सहजयोग पध्दतीचे परिणाम -एम डि.साठी प्रबंध दिल्ली विध्यापीठाकडून मान्यता १९८७

४) ताण -तणावाच्या उपचारातसहजयोगाची भूमिका सहजयोग पध्दतीचे परीणामएम.डि. साठी प्रबंध, दिल्ली विध्यापीठाकडून मान्यता, डॉ यु.सी.रॉय व इतर

५) मेंदुच्या लहरींची नोंद-अपस्मारामधे सहजयुओगाची भूमिका, -सेठी एस,सिंग एस.एच.-दिल्ली विध्यापीठ

६) संपुर्ण आरोयासाठी सहजयोजाचे महत्व डॉ.दिपक चुग,डॉ.सेठीएस,डॉ.सिंग एस. एच.

७) शेतकी विषयक संशोधने -राहुरी शेतकी विध्यापीठ-डॉ.एम.व्ही. कुलकर्णी

८) आरोग्य विषयक संशोधन ऑस्ट्रेलीया - डॉ रमेश मनोचा व इतर शासक्रर्य मान्यता

९) आरोग्य विध्यापीठ रशिया व सहजयोग प्रणाली आरोग्य विषयक करार

१०)रुमानिया-अरोग्य व सहजयोग विषयक मान्यता

वरिल श्रीमाताजींना मिळालेले किताब, मान, सन्मान हे चैतन्य लहरी मंडळाकडे उपलब्ध असलेल्या माहिती वरुन दिलेले आहेत, या शिवाय काही राहिले असल्यास कृपया पाठवावेत. ते पुढील अंकात प्रसिध्द केले जातील.

# दिवाळी पूजा

प.पू.श्रीमाताजी निर्मला देवींचे भाषण (सारांश)
ऑक्टोबर ८९, मँटेकाटीनी

दिवाळी पूजा म्हणजे देवांचा आनंद जाणून घेणे. दिवाळी १००० वर्षापूर्वी श्री रामांचा राज्याभिषेक झाला तेव्हा साजरी केली गेली. म्हणजे मानवतेच्या हिताचे त्या दिवशीराज्य रोहन झाले. सॉक्रेटीसने वर्णन केल्याप्रमाणे तो हितकारी राजा होता. हितकारी राजाचे राज्यरोहण झाले ही आनंदाची गोष्ट होती. जेव्हा लोक प्रजेच्या हिताशीवाय दुसरा कशाचाही विचार नाही असा राजा शोधुन काढतात, तेव्हाच फक्त ही गोष्ट शक्य होते. तेव्हा आपण या निर्णयाप्रत येतो की माणसाला सहजयोगी बनले पाहिजे. आपल्याकडे दोन प्रकारचे सिध्दात आहेत. एक म्हणजे (कॅपिटॅलीझम) भांडवलशाही व (कम्युनिझम) साम्यवादी. पहिली पैशावर आधारीत बदुसरी आज्ञाधारकतेवर. जी सहजयोगासाठी चांगली आहे. आज्ञाधारकपणा इतका महान आहे की, त्यांच्या हितासाठी त्यांना काही सांगा, ते लगेच तसे करतात. ते इतके सुज्ञ आणि गहन झाले आहेत. उलट दुसरीकडे आपण व्यक्तिगत स्वातंत्र्यात हरवलो आहोत. भांडवलशाहीच्या देशात हित संपुष्टात आले आहे. जेव्हा तुम्हाला वेड्यासारखे धावत सुटण्याचे स्वातंत्र असते, त्यावेळी तुम्ही स्वत:चा विनाश करुन घेता. उदा.लोक कुठल्याही प्रकारच्या विचीत्र फॅशनविषयी वेडे झाले आहेत; या कल्पना उद्योजकांकडुन येतात. ज्यांना तुमचा पुरा फायदा घ्यायचा असतो. हित हे सर्वोच्च आहे. आपण खरोखर स्वतंत्र लोक असलो तर आपल्यासाठी जे हितदायी आहे ते आपण स्विकारले पाहिजे.

दुसऱ्या दिवशी नरकासुर हा राक्षस देवाने मारला होता.आता दुष्ट लोक बक्षिसे घेत आहेत, हा विर्पयास कशासाठी? दृष्ट कृत्यांचा आनंद उपभोगणाऱ्या आपल्या मधिल दुष्ट प्रवृतीचा नाश केला पाहिजे. आपल्याला आपले प्रश्न अओळखले पाहिजेत.जेव्हा तुम्ही स्वत:पहाल तेव्हा ऱ्हदय उघडे होते. तुमचे ऱ्हदय उघडल्याशिवाय तुम्ही स्वत:चा आनंद उपभोगु शकत नाही. तुम्ही तुमचे ऱ्हदय उघडा. सर्व बंधने अटी निघून जातील.

प्रत्येक लहान गोष्टीमध्ये आनंदाचा तरंग आहे.तुमची जातपात,देश सर्व काही विसरा.तुम्ही जर तुमच्या सामुहीकतेमधे एकत्र होऊ शकला नाही तर तुमच्यामधे काहीतरी चुकते आहे. या दिवशी लक्ष्मी देवतेची पूजा केली जाते. तीला गर्व नसतो. ती इतरांवर दबाव घालत नाही. मानव प्राणी याउलट असतो. ज्याच्याकडे पैसे आहेत ते घोड्यावरुन जातात. **लक्ष्मी पाण्यावरुन बाहेर येते, कमळावर विश्रांती घेते आणि स्वत:चे वजन शोषून घेते.** आपल्याला आपली स्थिती, पैसा शिक्षण, घेतले पाहिजे. ह्या सर्व निरर्थक गोष्टी तुम्हाला जड व्यक्ति वरुन खाली ओढत असते. लक्ष्मीचा गुरुत्वाकर्षणाचा मध्य व्यवस्थित संतुलनात असतो. त्याच प्रमाणे तुम्हालाही संतुलनातच राहिले पाहीजे. तुम्हाला पृथ्वी मातेवर उभारले पाहीजे म्हणजे लहानशी गोष्ट झाली तरी तुम्ही संतुलनातमध्येयेऊ शकता. तिच्या दोन हतात गुलावी कमळे असतात. गुलाबी रंग उब,अगत्य,प्रेमळपणाचा स्वभावदाखवतो. ऊब म्हणजे हॉस्पिटल नव्हे किंवा घाणेरडे घर नव्हे तर आगत्यपुर्वक, उबदार सोयीचे श्रीमंत माणसाकडे दहा कुत्री बाहेर असतात, आत कोणी येऊ शकत नाही. काहीही जास्त नको. दिमाख नको, चढाई नको पण इतरांना आनंद व सोय देईल असे एखाद्या गोष्टीचे कौतुक व्हावे आणि यजमानाने म्हणावे इतक्या थोडक्यात त्याने केले, ही अतिथीला आनंद द्यावा असे वाटणाऱ्या व्यक्तिची खूण आहे. हे किती महान सदे सांगणे म्हणजे चढून जाणे आहे. तुम्ही सर्वांचा आनंद उपभोगला पाहिजे, नाही तर सहजयोगीच नाही. तुम्ही कलावंतांना


**सुषुम्नेच्या मध्यमार्गावर राहिल्यानें महालक्ष्मी तत्व वाढते. मग कोणीही तुम्हाला हात लावूं शकणार नाही.**

उत्तेजन दिले पाहीजे. कोणीतरी म्हणेल हा प्रामाणिकपणा नाही. कमळ चिखलाच्या तळ्यातउगवते, पण तुम्हाला चिखल दिसत नाही. पुर्ण तळे कमळांच्या सुवास आणि सौदर्याने भरते. तीथे प्रामाणिकपणा नसतो. सहजयोगी म्हणुन तुमचे काम काय आहे हे प्रामाणिकपणे समजण्यातच प्रामाणिकपणाआहे. तुमच्या प्रेमाने तुम्ही प्रत्येकाला उत्तेजन देत असता. तुमच्या प्रेमाने प्रत्येकात विश्वास निर्माण करीत सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे स्वत:शी प्रामाणिकपणे रहा. प्रथम तुमच्या मनाला अजमाउन घ्या. दुसऱ्याला लागेल असे बोलणार असाल तर ते थांबवणे बरे. दुसऱ्यांना खुश करणाऱ्या गोष्टी तुम्ही म्हणाल तर, तशाच प्रकारच्या तुम्हाल खुश करणाऱ्या गोष्टी तुम्हाला मिळतील. काही लोक असे असतात की ते कधीच हसत नाहीत, त्यांना गुदगुल्या करणे तुम्हाला माफ आहे, तुम्हाला मुलांसारखे बनले पाहिजे. लक्ष्मीतत्वाचे एक तत्व आनंदी राहणे हे आहे. दुसऱ्या हाताने लक्ष्मी येते. पैसेवाल्या लोकांनी ज्यांना गरज आहे अशांना पैसे द्यावेत पण अशा तऱ्हेने की कोणाला कळू नये. एकदम गुपचुपअसे की एका हाताला दुसऱ्या हाताने दिले आहे हे समजता नये. व्यक्तिची गरज काय आहे हे पाहायला पाहिजे. योग्य जागी आणि योग्य वेळी देण्याची गरज आहे. ते खळबळजनक नको, त्याने ऱ्हदय भरुन आलेपाहिजे. आध्यात्मिक वाढीसाठी तुम्ही जे द्याल ते उत्तम.

दुसऱ्या हाताने लक्ष्मी रक्षण करते. हा हात सर्व सहजयोग्यांचा रक्षणकर्ता आहे. मी नेहमी सहजयोग्यांच्या पाठीशी उभी राहिल कारण तीथे आत्मा हजर आहे. सर्व कलावंत, कला, काव्य, साहित्य, प्रामाणिक राजकारणी लोक, सरळमार्गी सरकारी नोकर आणि ज्याना रक्षणाची जरुरी आहे, त्या सर्वांचे मी रक्षण करील. पण जे खराब आहेत, त्यांनाआधार देऊ नये. दुसऱ्यांच्या चांगुलपणाचे रक्षण केले पाहिजे, मग ते सहजयोगी नसले तरी हरकत नाही. त्यांच्या चांगल्या गुणांचे रक्षण केले पाहिजे. तुम्ही अक्षय, चिरंतन, जगाचे संरक्षक आहात. तुम्ही कुर होता कामा नये. जेव्हा सासु-सुनेचे भांडण आपण पहातो तेव्हा म्हणतो की, किती भांडकुदळे आहेत. तरी पण आपण तेच करतो. आपण तलवारी नाहित तर कमळे आहोत. कोणाला मारायचे असेल तर कमळाने मारा, तलवारीने नको. कमळाने कसे मारायचे हे शिकण्यासाठी सहजयोगात फार गहनातउतरायला पाहिजे.

**एकदा लक्ष्मीने तुम्हाला आश्रय दिला की तुमचे महालक्षीतत्व वाढते.** नंतर तुम्ही जगाच्या हिताचा विचार करता. त्यांनाआत्मसाक्षातकार कसा द्यायचा. या बद्दल तुमचा दृष्टीकोण बदललेला असतो. आपण प्रश्न सोडविण्याकरीता आलेलो असून **जग हा आपला प्रश्न आहे.** आपल्याला जबाबदाऱ्या घेतल्या पाहिजेत. तुम्ही आर्किटेक असाल, तर आपल्या हातून काहीतरी महान निर्माण करा. संगीततज्ञ असाल तर चांगले संगीत तयार करा. मी तुम्हाला मदत करेन. प्रत्येकाचे व्यक्तिमत्व वाढते आहे. जर सुषुम्नेच्या मध्य मार्गावर रहाल तर कोणीही तुम्हाला हात लावु शकणार नाही. दुसऱ्यातल्या चुका तुम्हाला काढावयाच्या नाहीत. मग तुम्ही सहजयोगीच नाहींत. लिडरने सुध्दा ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करु नये. ब्रम्हचैतन्य हे शांत तत्व आहे सर्व काही तेच करते, तुम्हाला सर्व काही स्वीकारण्यासाठी, तसेच तुमच्या प्रगतीत कैलासाची उंची गाठण्यासाठी नेहमी शांत राहिले पाहिजे.

ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो.



धर्मा नुसार वागणारा माणुस स्वत:चीच प्रामाणिकपणे परीक्षा करतो.धर्मामुळेच ही क्षमता मिळते.असा माणुस वागताना नेहमी आपले बरोबर आहे ना,काही चुकले नाही ना, या बाबत सतत काळजी घेतो. स्वपरीक्षेतूनच तुमची जाणीव उन्नत होते.नंतर तुम्हाला आपले काय चुकते ते समजते.बाहेरच्या सर्व गोष्टी वरवरच्या आहेत.पण तुमच्या अंतरंगातील कार्य अशा उज्वल जाणिवतून व स्वपरिक्षेतूनच चालते.

# श्री गणेश पूजा (वृत्तांत)कवेला

(ई मेल व्दारा सप्टेंबर २००१)

सहज समाचार

गुरुवार दि. २१ सप्टेंबर २००१ रोजी सायंकाळ पासून पुजेसाठी येणाऱ्या सहजयोग्यांनी गर्दी केली होती. त्यावेळी पाऊस चालु होता. तसेच हावेत खूप गारवा होता.थंडी वाढली होती. ढग अगदी खाली उतरले होते व कवेल्याभोवतालच्या सर्व टेकड्या आच्छादुन गेल्या होत्या. नदीकिनाऱ्या जवळच्या हँगर मध्ये जवळ जवळ १५०० सहजयोगी पूजेच्या कार्यक्रमासाठी जमले होते.

शुक्रवारी सायंकाळी ११ वा.हवनाचा कार्यक्रम सुरु झाला. श्री अरुण गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तयारी झाली. पावसाचा हलका शिडकावा चालु च होता. हवनासाठी सर्व सहजयोगी उपस्थित होते. एकादशरुद्राच्या नामावलीचे मंत्र घेण्यात आले. सर्व नकारात्मक शक्तींचा निःपात होण्यासाठी सर्व मन्त्रांबरोबर सर्वांच्या मुखातुन 'ओम स्वाहा' चे उच्चार बाहेर पडत होते, व त्याबरोब्र चैतन्य लहरी वाढत गेल्या. पूर्णाहुतीने हवन संपले.

संध्याकाळी श्रीमाताजी व सर श्री सी.पी.साहेबांच्या उपस्थितीत संगीत संध्येला सुरुवात झाली. सुरुवात श्रीमाताजींनी अमेरीकेचे अध्यक्ष श्री बुश यांना पाठवीलेल्या पत्राच्या वाचनाने झाली. पत्राचा आशय व श्री माताजींनी श्री बुश यांना लढ्यासाठी दिलेले आशिर्वाद ऐकून सर्वजण मंत्रमुग्ध झाले. त्यानंतर पूर्व आशिया, भारत व रशिया इ. यजमान देशातील सहजयोग्यांनी नृत्य नाटिका आणि गाण्याचा वैविध्यपूर्ण कार्यक्रम सादर केला.
कार्यक्रम संपल्यानंतर नियोजित विवाहोत्सुक वधु-वरांच्या नावांची पहिली यादी घोषित झाली. सर्व युगुलांनी श्रीमाताजींच्या चरणावर जाऊन त्यांचे आशिर्वाद घेतले. कार्यक्रम संपला तेव्हा सकाळचे ६ वाजले होते.

शनिवारी गणेश पूजेचा मुख्य कार्यक्रम रात्री १० वा.सुरु झाला. श्रीमाताजींनी आपल्या भाषणात अमेरिकेवर झालेल्या हल्यातून विश्वाच्या एकुण अबोधितेवरच हल्ला झाल्याचे सांगितले. त्यामुळेच अशा दहशतवादी कृत्याविरुध्द लढण्यासाठी सर्व शक्ति एकत्र आल्या पाहिजेत व अशा राक्षसी वृत्तिंचा नाश घडविण्यासाठी मोठा लढा देण्याची जरुरी आहे असे सुचविले. त्यानंतर त्यांनी श्री गणेशांच्या ठायी असणाऱ्या विविध गुणांचे सखोलपणे व आर्थपूर्वक असे भाषण केले.(श्री माताजींचे संपूर्ण भाषण अंकात सुरुवातीला दिलेले आहे) श्री माताजींना विविध देशांतर्फे भेटवस्तू अर्पण केल्यानंतर कार्यक्रम संपला, त्यावेळी पहाटेचे ४ झाले होते.

रविवारी विवाहाचा दिवस. सकाळी १० वा. हळदी कार्यक्रमाची सुरुवात झाली. नव वधु-वरांनी अगदी उत्सकतेने हळद लाऊन घेतली सायंकाळी ७ वा च्या सुमारास श्रीमाताजींच्या प्रसादात नव वधु-वरांनी श्रीमाताजींची गौरी स्वरुपात पूजा करुन आशिर्वाद घेतले. साधारण आठच्या सुमारास मिरवणुकीने सर्व- वर- मंडळींचे सभामंडपात (हँगरमध्ये) आगमन झाले. एकुण ८० लग्ने झाली. हँगरमध्ये होमकुंड मांडण्यात आले होते. मंगलाष्टके झाल्यानंतर अंतरपाट दूर झाला व वधु वरांनी एकमेकांना वरमाला घातल्या. सर्व वातावरण चैतन्यमय झाले होते. त्यानंतर वधु-वर होमहवना जवळ स्थिरावले. सप्तपदी, होम, कन्यादान इ.कार्यक्रम नेहमीप्रमाणे विधिवत पार पडले व विवाह सोहळ्याची सांगता झाली.

# ग्रीसमधील नवरात्री पूजा

(वृतांत ई मेल द्वारा)

या वेळीची नवरात्री पूजा ग्रीसमध्ये आयोजित केली होती. कार्यक्रम शुक्रवार दि.१९ आक्टोबर व शनिवार दि.२० आक्टोबर रोजी झाले. रात्री संगीताचे कार्यक्रम झाले. युक्रेन, ब्रिटन, टर्की, स्कॅाटलंड शिवाय इतर काही देशतील सहजयोग्यांनी निरनिराळे कार्यक्रम ढंगदारपणे सादर केले.प.पू.श्रीमाताजींच्या उपस्थितीत कार्यक्रम आणखी रंगतदार झाले रात्री उशिरापर्यंत चालले होते.

रविवारी रात्री पूजेच्या मुख्य कार्यक्रमाची सुरुवात शनिवारी न झालेल्या सहजयोग्यांच्या कार्यक्रमाने झाली. नवरात्री पूजेचे सर्व सहजयोग्यांना एक विषेश महत्व जाणवत होते. श्रीमाताजींनी पूजेच्या भाषणाची सुरुवात सध्या सुरु असलेल्या युध्याच्या उल्लेखाने केली. विषेशत: इस्लाम व मुस्लीम लोकांना दाखविला गेलेला चुकीचा मार्ग याबावत त्यानी परखडपणे विचार व्यक्त केले. सध्याची परिस्थिति व असुरी वृतींचा सुळसुळाट जर संपवावयाचा असेल तर सहजयोग्यांची प्रेमशक्तीचा उपयोग करुन हे प्रश्न संपतील, सुटतील. यासाठी सहजयोग्यांनी आत्मपरिक्षण करावे. आपल्या आतमध्ये काही किल्मिश असेल तर ते काढुन टाकले पाहिजे. सहजयोगाचा आनंद लुटत असताना आपल्यावर असणाऱ्या महत्वाच्या जबाबदारीचा सहजयोग्यांनी विसर पडू देऊ नये. त्यासाठी तुमच्या ऱ्हदयात असणाऱ्या प्रेमशक्तिचाच तुम्हाला उपयोग होईल. (श्री माताजींचे संपूर्ण भाषण अंकात सुरुवातीला दिलेले आहे) यानंतर पूजा अगदी आटोपशीरपणे झाली. तरीही त्यातील तीक्षता, गहनता सर्व सहजयोग्याच्या दुष्टीने विषेश जाणवली. पूजेच्या दिवशी युवाशक्तिची सभा आयोजित केली होती. त्यासाठी केवळ एक तास वेळ दिलेला होता. त्यावेळी युवाशक्तिच्या कार्यावर बरेच विचार मंथन झाले. त्यांनी एकूण चाललेल्या कार्यावर आपले विचार मांडले. काहींनी गॅब्रियल व मायकेल यावर अभ्यास व संशोधन करण्याची इच्छा प्रदर्शित केली.काही नविन सभासद झालेले दिसुन आले.

मंगळवारी रात्री श्रीमाताजींच्या उपस्थितीत अथेन्समध्ये नोव्होटेल हॅाटेल मध्ये एका जाहीर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. नऊच्या सुमारास युक्रेनच्या सहजयोग्यांच्या भजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. १५-२० मिनीटांनी बॅांबच्या अफवेने थोडासा गोंधळ झाला. तरी भजनाचा कार्यक्रम चालूच होता. पण थोड्याच वेळात हॅाल पुन्हा भरुन गेला. त्यानंतर श्रीमाताजींचे आगमन झाले. आपल्या भाषणात त्यांनी ग्रीस व ग्रीसमधिल साधक यांच्या विषेश गुणाबद्दल उल्लेख केला. तसेच अथेना-सॅाक्रेटीस व भारत-ग्रीस यांचे संबंध यावर त्या बोलल्या. नंतर सर्वांना आत्मसाक्षातकार दिला. सर्वांना थंड चैतन्य लहरींची जाणीव झाली.

### सहजयोग्यांनी दररोज ध्यान करणे आवश्यक आहे

ध्यानासाठी अधिक वेळ देण्याची आवश्यकता नाही.पण जो काही वेळ तुम्ही देता व जे काही तुम्हाला त्यातुन प्राप्त होते,ते बाह्यात दिसून यायला हवे.तुमच्यातुन ते बाहेर यायला हवे.अशा स्थितीचे संत तुम्हाला व्हावयाचे आहे.गहनतेमध्ये गेल्याशिवाय इतर सहजयोग्यांना तुम्ही वाचवु शकणार नाही व जे सहजयोगी नाहित त्यांना आपण वाचवु शकणार नाही.

श्रीमाताजी २७ जुलै,१९८१

जे सहजयोगात येतात आणि ध्यान करीत नाहित व उन्नत होत नाहित,ते नष्ट होतत अथवा सहजयोगाच्या बाहेर फेकले जातात.

श्रीमाताजी २८ जुलै १९८५

ध्यान आपल्या जीवनाचा अविभक्त भाग आहे.मानवाला जसा श्वास घ्यावा लागतो,तसे तुम्हाला ध्यान करायला हवे.यान करणार नसाल तर तुम्ही कधीही मोठे होणार नाही.तुम्ही तसेच रहाल.जेव्हा ध्यान करुन गहन होता तेव्हा तुमच्या व्यक्तिमत्वाचा विकास होतो.उथळपणाचा कधीही फायदा होणार नाही.या कारणासाठी ध्यान करायला हवे,पण ते फार वेळ नाही.

श्रीमाताजी २मे१९८७

वृध्दिंगत होण्यासाठी आपण रोज ध्यान करायला हवे.रोज,अगदी रोजच्या रोज,ध्यान करणे महत्वाचे आहे. एखाद्या दिवशी जेवण करु नका,पण रोज ध्यान करा,हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

# पुणे सहजयोग केंद्र पब्लिक प्रोग्राम

मागील अंकात पुणे केंद्रातर्फे जोमाने सुरु केलेल्या ज्पब्लिक प्रोग्राम्सच्या कार्याची माहिती दिली आहेच.या कार्याची गती दिवसेंदिवस वाढत आहे व सहजयोगी बंधू-भगिनी उत्साहाने त्यात भाग घेत आहेत.गेल्या महिन्या-दिड महीन्यात झालेले काही कार्यक्रम:-

| अ.क्र. | वार/दिनांक | ठीकाण | वेळ | |
|---|---|---|---|---|
| १) | शनिवार ३.११.२००१ | ॲग्रीकल्चर कॉलेज स्टाफ | दु. ४ वा. | |
| २) | रविवार ४.११.२००१ | पर्वती दर्शन<br>प्रकाश सर्जेराव स्कुल<br>क्र.१०६ | स.१० ते सं ६ | नवीन सेंटर<br>सुरु झाले आहे. |
| ३) | सोमवार ५.११.२००१ | बॅटबिंटन हॉल,<br>आनंद नगर कोथरुड | सं. ७.०० | नवीन सेंटर<br>सुरु झाले आहे |
| ४) | गुरुवार २२.११.२००१ | जीवन विद्या मंदिर<br>चिखली गांव,पुण | सं. ७.०० | नवीन सेंटर<br>प्रस्तावीत |
| ५) | शनिवार २४.११.२००१ | खेडशिवापुर, चित्रा नाईक संस्था | सं. ६.०० | नवीन सेंटर<br>प्रस्तावीत |
| ६) | रविवार २५.११.२००१ | टिंगरेनगर,विश्रांतवाडी,<br>अर्शीवाद मंगलकार्यालय<br>अळंदी,पुणे | स १० ते सं.५ | नवीन सेंटर प्रस्तावीत |
| ७) | गुरुवार २८.१०.२००१ | वसंतदादा पाटील शाळा<br>क्र.५४ सोमेश्वरवाडी<br>पाषाण, | स.१० ते सं ६ | नवीन सेंटर<br>सुरु झाले आहे |
| ८) | गुरुवार २८/११/२००१ | मंत्री कॉम्प्लेक्स<br>दापोडी | स.१० ते दु ३ | नवीन सेंटर<br>सुरु झाले आहे |
| ९) | शुक्रवार ३०.११.२००१ | मुक्तांगण व्यसन मुक्ती केंद्र,<br>विश्रांतवाडी, टिंगरेनगर | स.१० ते सं.६ | |

१०) नवरात्री उत्सवांमधे पुण्यातील प्रसिध्द चतुःश्रृंगी देवीच्या परिसरात विवेकानंद या शाळेत रोज संध्याकाळी पब्लीक प्रोग्राम व जागृतीचा कार्यक्रम ठेवलेला होता.त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला.साधारण ३००० नविन लोकांना जागृति मिळाली.

११) नवरात्रीत पूण्यातील कोथरुड परीसरातील प्रसिध्द भवानीमाता मंदिराच्या डोंगरावर मंडप टाकुन नवरात्रीत रोज संध्याकाळी पब्लीक प्रोग्राम व जागृतीचा कार्यक्रम ठेवलेला होता. साधारण ४५००-५००० लोकांनी जागृति घेतली.

* पुणे सेटर मधील युवा शक्तिने सहजयोग प्रसारा साठी एक पथनाट्य विंचु चावला बसविलेले आहे. तरी ज्यांना सदर पथ नाटकाचा सहजयोग प्रसारासाठी उपयोग करुन घ्यावयाचा आहे त्यांनी पुणे सेंटर च्या आश्रमात संपर्क साधावा.

* 'पुणे व परिसरातील गावांमधे आता एकूण ५५ ध्यान केंद्रे सुरु झाली आहेत.

*Thank you Mother*



